रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ९७
www.ramprahar.com

बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रामचंद्र घरत नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्षपदी/२
जमीन लाटण्यासाठी सातबाऱ्यांमध्ये हेराफेरी/५
कुस्तीपटू क्षितिजाची सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक/८

## विधानसभेसाठी राज्यात चौथ्या आघाडीची घोषणा



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात चौथ्या आघाडीची घोषणा करण्यात आली आहे. प्रस्थापित समाज ओबीसी आरक्षणात दिवसाढवळ्या घुसत आहे. केवळ ओबीसीच नाही तर दलित आणि इतर समुदायाच्या आरक्षणावर घाला घालण्याचे काम सुरू आहे. आरक्षण वाचवायचे असेल तर सर्व आरक्षणवाद्यांनी एकत्रित येणे गरजेचे आहे, असे सांगत ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी आरक्षणवादी आघाडीची घोषणा केली आहे. आनंदराज आंबेडकर या आघाडीत सहभागी आहेत. रिपब्लिकन सेना, ओबीसी पक्ष सहभागी आहेत. आरक्षणवादी जेवढे पक्ष आहेत त्या सर्वांनी एकत्रित यावे, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी आनंदराज आंबेडकर यांनी गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे, परंतु ओबीसीत नको असेल तर वेगळे आरक्षण घ्यावे, असे सांगून प्रकाश आंबेडकर यांनाही सोबत येण्याच्या प्रश्नावर भाष्य केले.

# महाविकास आघाडीत फूट

## शेकापकडून रायगडातील चार उमेदवारांची घोषणा

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने रायगड जिल्ह्यातील उमेदवार करण्याआधीच शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग, पेण, उरण व पनवेल या चार विधानसभा मतदारसंघातील आपले उमेदवार जाहीर केले. त्यामुळे रायगडात महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे समोर आले आहे.

शेकापचे सरचिटणीस, माजी आमदार जयंत पाटील यांनी मंगळवारी (दि. २२) अलिबागमधील शेतकरी भवन येथे झालेल्या पक्षाच्या मेळाव्यात अलिबाग विधानसभा मतदारसंघातून चित्रलेखा पाटील, उरणमधून प्रीतम म्हात्रे, पेणमधून अतुल पाटील आणि पनवेलमधून बाळाराम पाटील यांना उमेदवारी दिल्याची घोषणा केली.

उमेदवार जाहीर केले असली तरी आम्ही आजही महाविकास आघाडीसोबत आहोत, इंडिया आघाडीत आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबरोबर आपले बोलणे झाले असून त्यांनी शब्द दिला आहे. त्यामुळे सारे व्यवस्थित होईल, अशी सारवासारव जयंत पाटील यांनी या वेळी केली.

### पंडित पाटील, आस्वाद पाटील मेळाव्याला गैरहजर

शेकापच्या मेळाव्यास पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, राज्य महिला आघाडी चिटणीस मानसी म्हात्रे, चित्रलेखा पाटील, बाळाराम पाटील, प्रीतम म्हात्रे, अतुल म्हात्रे, प्रा. एस.व्ही. पाटील उपस्थित होते, मात्र जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडित पाटील, शेकापचे माजी जिल्हा सरचिटणीस ॲड. आस्वाद पाटील या मेळाव्याला गैरहजर होते. त्यामुळे त्यांची नाराजी कायम असल्याची चर्चा आहे.

### सांगोल्याच्या जागेवर वाद

दरम्यान, सांगोल्याच्या जागेवरून महाविकास आघाडीत वाद होण्याची शक्यता आहे. या जागेवर शेतकरी कामगार पक्षाकडून दावा सांगितला जात आहे. शेकापकडून बाबासाहेब देशमुख हे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी करत असताना माजी आमदार प्रकाशआबा साळुंके यांनी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केला आहे. ते 'उबाठा'कडून सांगोल्यातून उमेदवार असण्याची शक्यता आहे.

## मनसेच्या ४५ उमेदवारांची घोषणा

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाकडून उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत एकूण ४५ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव तथा मनसे नेते अमित ठाकरे यांचीदेखील उमेदवारी जाहीर झाली आहे.

अमित ठाकरे यांना माहीम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे, तर संदीप देशपांडे यांना वरळीतून उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे वरळीत ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे विरुद्ध मनसेचे संदीप देशपांडे यांच्यात काँटे की टक्कर असणार आहे. यापूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कल्याण ग्रामीणमधून राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव अशी दोन नावे जाहीर केली होती.

# ...तोपर्यंत नैना प्रकल्पाची वीटदेखील ठेवू देणार नाही

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही; जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जोपर्यंत सर्वांच्या शंकांचे निरासन होत नाही तोपर्यंत नैना प्रकल्पाची वीटदेखील ठेवू देणार नाही, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिपळे येथे जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनावेळी दिली तसेच भाजपची विकासात्मक भूमिका सर्वसामान्य जनतेमध्ये पोहचवून विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार पुन्हा निवडून देण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हावे, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून अनेकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचाराचा झंझावात पहावयास मिळत आहे. या अनुषंगाने तालुक्यातील चिपळे येथे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. २१) झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्ष जनसामान्यांमध्ये मिळून काम करणारा पक्ष आहे. आज सुरू झालेल्या या कार्यालयाच्या माध्यमातून लोकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी एक हक्काचे ठिकाण उपलब्ध झाले आहे. त्यामुळे मला खात्री आहे निवडणुकीनंतरदेखील संपूर्ण परिसरातील लोकांना सेवा देणारे केंद्र बनून हे कार्यालय काम करेल. या वेळी त्यांनी विरोधकांच्या खोट्या अफवांचा खरपूस समाचारही घेतला.





या कार्यालयाच्या उद्घाटन समारंभास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच अनंत ढवळे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, हनुमान फुलोरे, अशोक फुलोरे, रूपेश फुलोरे, गिरीश फुलोरे, बूथ अध्यक्ष भास्कर फुलोरे, कल्पेश फुलोरे, किशोर फुलोरे, गणेश फुलोरे, राजेश फुलोरे, हरिदास फुलोरे, गणेश फुलोरे, धीरज फुलोरे, अमोल फुलोरे, लहू फुलोरे, रमेश फुलोरे, दत्ता फुलोरे, माजी सरपंच रमेश पाटील, माजी सदस्य गणेश म्हसकर, माजी उपसरपंच धनंजय पाटील, रोशन पाटील, महेश शाह, नागेश म्हसकर, हभप धनाजी म्हसकर, आकाश पाटील, कुलदीप पाडवी, विवेक पांडेय, रोहित पाटील, चंद्रकांत राणे, अनुराग पांड्या, सुनील फडके, समाधान फडके, रूपेश फडके, कान्हा फडके, अनंता फडके, मंगेश फडके, दीपक फडके, समीर पाटील, दुशांत पवार, सुनील पाटील, भरत पाटील, नामदेव पाटील, साईनाथ पाटील, दिनकर पाटील, सागर पाटील, संदेश फडके, भावेश फडके, अभिनय पाटील, नितीन पाटील, अक्षय पाटील, स्वप्नील फडके, समीर पाटील, विजय पाटील, विशाल पाटील, तुकाराम पाटील, तन्मय पाटील, सुभाष पाटील, शरद म्हस्कर, सचिन पाटील, प्रतिक पाटील, प्रतीक फडके, प्रनिल फडके, प्रसाद पाटील, निलेश पाटील, नारायण पाटील, महेंद्र पाटील, किरण पाटील, सौरभ पाटील, योगेश पाटील, दिनकर पाटील, धीरज म्हात्रे, अविनाश म्हात्रे, संजय पाटील, रोहित पाटील, विठ्ठल पाटील, हौशिराम फडके, हरिश्चंद्र पाटील, हरिश पाटील, अजित म्हात्रे, विष्णू पाटील, रवी पाटील, नरेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

### 'उबाठा'चे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल

*या कार्यक्रमाचे औचित्य साधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भोकरपाडा गावातील शाखाप्रमुख गजानन फुलोरे, अनिकेत फुलोरे, अभिजित फुलोरे तसेच विहिघरमधील रहिवासी तथा विरार येथील 'उबाठा'चे शाखाप्रमुख विश्वनाथ कांबळे यांनी भाजपमध्ये सहभागी होत पक्षाची ताकद अधिक मजबूत केली. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत करून आपला निर्णय सार्थ ठरेल असे काम भाजपच्या माध्यमातून होईल, असा विश्वास त्यांना दिला.*

## निवडक

### सचिन वाझे यांना जामीन; मात्र मुक्काम तुरूंगातच!



**मुंबई** : राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतरांविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून तुरूंगात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन मंजूर झाला आहे, पण मनसुख हिरेन हत्याकांड आणि अँटिलिया स्फोटक प्रकरणातील कैदेमुळे वाझेंचा मुक्काम तूर्तास कारागृहातच राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

### बंगळुरूमध्ये बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली

**बंगळुरू** : मुसळधार पावसामुळे बंगळुरू पूर्व येथील होरामवू आग्रा भागात बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली. यामध्ये अनेक मजूर अडकले असल्याने आपत्कालीन सेवा कामगारांचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी पोहचल्या. प्राथमिक तपासानुसार संपूर्ण इमारत कोसळली यामुळे काम करणारे मजूर अडकले. गेल्या तीन दिवसांपासून बंगळुरूमध्ये सतत पाऊस पडत आहे. यामुळे अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

## तिसरी मुंबई 'केएससी न्यू टाऊन' नावाने ओळखणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएने या तिसऱ्या मुंबईला खास नाव ठेवले आहे. ही तिसरी मुंबई कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन अर्थात केएससी न्यू टाऊन ओळखली जाणार आहे.

मुंबई शहरावर येणारा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई शहर विकसित करण्यात आले. आता या दोन्ही शहरातील पायाभूत सुविधा आणि येथील दळणवळणाच्या सुविधांवर वाढणारा ताण पाहता राज्य शासनाकडून मुंबई आणि नवी मुंबईला पर्याय देण्यासाठी तिसरी मुंबई विकसित केली जात आहे. या अनुषंगाने नवी मुंबई विमानतळानजीकच्या परिसरात एक नवे शहर उभारले जात आहे.

एमएमआरडीएच्या माध्यमातून नवे शहर निर्माण केले जाणार आहे. कर्नाळा-साई-चिरनेर (केएससी) न्यू टाऊन असे या शहराचे नाव ठेवण्यात आले आहे. जवळपास ३२३ चौरस किलोमीटर क्षेत्रावर केएससी न्यू टाऊन विकसित केले जाणार आहे.



### विविध सुविधा मिळणार

*केएससी न्यू टाऊनमध्ये १२४ गावांचा समावेश आहे, ज्यात नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) अंतर्गत ८०, खोपटा न्यू टाउन अधिसूचित क्षेत्र अंतर्गत ३३, मुंबई महानगर प्रादेशिक योजनेंतर्गत दोन आणि रायगड प्रादेशिक योजनेंतर्गत नऊ गावांचा समावेश आहे. कर्नाळा पक्षी अभयारण्य तसेच जेएनपीए बंदर हेही या नव्या शहराच्या क्षेत्रात येत आहेत. एखाद्या विकसित शहरात ज्या सोयीसुविधा नागरिकांना मिळतात त्या सर्व या नव्याने उभारण्यात येणाऱ्या शहरात मिळणार आहेत. शिवाय या शहराला कनेक्टीव्हीटीच्या उत्तम सुविधा मिळणार आहेत.*

## बिश्नोई गँगच्या आरोपीला पोलीस कोठडी

**पनवेल : वार्ताहर**

बॉलीवूडचा दबंग अभिनेता सलमान खान याच्या हत्येचा कट रचणे तसेच त्याच्या राहत्या घरावर फायरिंग करून ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या बिश्नोई टोळीतील मुख्य आरोपी सुखबिर बलबिर सिंग उर्फ सुरण्या शुटरला पनवेल शहर पोलिसांनी हरियाणातील पानिपत येथून अटक केली होती. या आरोपीला मंगळवारी (दि. २२) पनवेल न्यायालयात हजर केले असता त्याला २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

आरोपीकडून इतरही आरोपींची माहिती घेणे बाकी आहे तसेच इंटरनॅशनल आरोपींशी याचे संबंध असून त्या दृष्टीनेसुद्धा पुढील तपास करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानुसार न्यायालयाने आरोपीला २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

## दहावीची परीक्षा आता आणखी सोपी!

### कमी गुण असूनही मिळणार अकरावीला प्रवेश

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दहावीच्या परीक्षेसंदर्भात महत्त्वाचा बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यानुसार गणित आणि विज्ञान या विषयात ३५ गुणांपेक्षा कमी आणि २० गुणांपेक्षा अधिक गुण असल्यास अकरावीला प्रवेश घेता येणार आहे.



राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तयार केलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या मसुद्याला राज्य शासनाने नियुक्त केलेल्या सुकाणू समितीने अंतिम मान्यता दिली आहे. हा आराखडा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्य मंडळातर्फे दहावीची परीक्षा घेण्यात येते. प्रचलित पद्धतीनुसार दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी सर्व विषयांत किमान ३५ गुण मिळवावे लागतात, मात्र अनेकांना गणित, विज्ञान विषयांची भीती वाटते. त्या दडपणाखाली अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण होतात. त्यांना सत्र कायम ठेवण्याची मुभा (एटीकेटी) असल्याने अकरावीला प्रवेश मिळतो, पण पुरवणी परीक्षा देऊन अनुत्तीर्ण विषयांत उत्तीर्ण व्हावे लागते.

आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार होणाऱ्या बदलानुसार दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्याने गणित आणि विज्ञान या विषयांत ३५पेक्षा कमी आणि २०पेक्षा जास्त गुण मिळवल्यास त्या विद्यार्थ्याला अकरावीला प्रवेश दिला जाणार आहे, मात्र पुढील शिक्षणात गणित किंवा विज्ञान किंवा दोन्ही विषयांवर आधारित विषय घेता येणार नाहीत असा शेरा गुणपत्रिकेवर नमूद केला जाईल तसेच गणित, विज्ञान या विषयांतील अभ्यासक्रम घ्यायचे असल्यास विद्यार्थ्याला पुरवणी परीक्षेत त्या विषयांत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे.

## रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची चमक

### १० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील १० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत मुंबई विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा गोरेगाव येथे झाली. यामधील ज्यूडो क्रीडा प्रकारात उसामा पटेल याने ९० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. त्याची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे.

कुस्ती स्पर्धेत माध्यमिक विभागाची प्रिती राजेंद्र पुहाल, उच्च माध्यमिक विभागाची ईशिता शिंदे, मुलांमध्ये विक्रांत सिंग, आशु शहा यांनी सुवर्णपदक जिंकले. त्यांची पाथर्डी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. वुशू स्पर्धेत उच्च माध्यमिक विभागाची निर्जला शाही, मुलांमध्ये प्रित भोईर, आर्यन भातोसे यांनी सुवर्णपदक मिळविले. त्यांची नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे.

बॉक्सिंग स्पर्धेत उच्च अल्फिया अन्सारी, मुलांमध्ये अविक मुखर्जी यांनी सुवर्णपदक मिळविले. या खेळाडूंचीही राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे केले. या वेळी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर उपस्थित होते.

दरम्यान, यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रभाकर जोशी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

## वेध दिवाळीचे!





**पनवेल, उरण : तमसो मा ज्योतिर्गमय अर्थात अंधारातून उजेडाकडे असा संदेश देणारा दिवाळी सण जवळ येत आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठा दीपावलीच्या साहित्याने सजल्या आहेत. आकर्षक आकाशकंदील लक्ष वेधून घेत आहेत. त्याचप्रमाणे रांगोळी, विविध रंगही उपलब्ध आहेत. यानिमित्ताने मोठी उलाढाल होत असल्याचे चित्र आहे.**

# रायगड मतदारसंघासाठी दोन निवडणूक खर्च निरीक्षक नियुक्त

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सात मतदारसंघामध्ये निवडणूक निर्भय, भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व अधिकार्‍यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे व सदैव दक्ष राहून पार पाडावी, असे निर्देश पनवेल, पेण, कर्जत, उरण मतदारसंघ निवडणूक खर्च निरीक्षक राजेश कुमार यांनी दिले.

**जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेचा आढावा**



भारत निवडणूक आयोगाने रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी दोन निवडणूक खर्च निरीक्षक नियुक्त केले आहेत. पनवेल, पेण, कर्जत, उरण मतदारसंघासाठी भारतीय महसूल सेवेतील २००५च्या तुकडीचे अधिकारी राजेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड मतदारसंघांसाठी भारतीय महसूल सेवेतील २०१५ च्या तुकडीच्या अधिकारी ज्योती मीना यांची नियुक्ती केली आहे. त्यांचे मंगळवारी (दि.२२) रायगड येथे आगमन झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात या दोन्ही खर्च निरीक्षकांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील सर्व कार्यान्वयीन यंत्रणाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक रविकिरण कोले, खर्च तपासणी विभागाचे नोडल अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांचेसह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

या वेळी राजेश कुमार यांनी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी निवडणूक प्रक्रियेदरम्यान बँकांमध्ये होणारे दैनंदिन व्यवहार, संशयास्पद व्यवहारांवर विशेष लक्ष द्यावे, तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय अतिसंवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली व अशा भागात विशेष उपाययोजना राबविण्याबाबत उत्पादन शुल्क विभाग, आयकर अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकार्‍यांना सूचना दिल्या. निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच व योग्य प्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातींकडे लक्ष देण्याबाबत जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या नोडल अधिकार्‍यांना निर्देश दिले.

निवडणूक खर्च निरीक्षकांनी सर्व सहाय्यक निवडणूक अधिकारी व नोडल अधिकार्‍यांकडून निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती घेतली. निवडणूक काळात प्रलोभन दाखविण्यासाठी साड्या, मद्य, वस्तू, पैसे यांचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सजग राहून अशा बाबींना तत्काळ निर्बंध घालावा व संबंधितांवर कारवाई करावी. उमेदवाराकडून प्रचारासाठी केल्या जाणार्‍या प्रत्येक खर्चाची काटेकोरपणे नोंद घ्यावी. निवडणूक आयोगाच्या निर्देश व सूचनांचा कुठेही भंग होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी, असेही निर्देश खर्च निरीक्षक राजेश कुमार यांनी दिले.

निवडणूक खर्च निरीक्षक यांनी ज्योती मीना यांनी सहकारी बँका मार्फत होणारे व्यवहार तसेच राष्ट्रीयकृत बँकांमार्फत होणारे व्यवहारांवर करडी नजर ठेवण्याचे निर्देश दिले. पेड न्यूजवरदेखील विशेष लक्ष ठेवावे असेही सांगितले. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार प्रत्येक यंत्रणेनी कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाला भेट दिली आणि आढावा घेतला.

# सी-व्हिजिल ॲपवर ९१० तक्रारी प्राप्त; ८९९ निकाली

**मुंबई : प्रतिनिधी**




राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २२ ऑक्टोबरपर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ९१० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८९९ म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादीबाबतीत एकूण ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येते.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

# नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्षपदी रामचंद्र घरत

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

भाजपचे लोकसभा निवडणूक सहप्रमुख, उरण विधानसभा निरीक्षक, मीरा भाईंदर विधानसभा समन्वयक डॉ. रामचंद्र घरत यांची नवी मुंबई जिल्हाध्यक्ष म्हणून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नियुक्ती केली.



यापूर्वी नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदाची धुरा सांभाळणारे माजी आमदार संदीप नाईक यांनी मंगळवारी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहातील कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केल्याने भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने रामचंद्र घरत यांची नवी मुंबई जिल्हाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. मधल्या काळात नवी मुंबई शहरात फक्त नेते दिसत होते, मात्र भाजप दिसत नव्हती. आता माझी पुन्हा जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली असून शत प्रतिशद भाजप शहरात दिसेल, अशी ग्वाही घरत यांनी दिली.

# आमदार गणेश नाईक यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार गणेश नाईक यांच्या निवडणूक प्रचाराचा सोमवारी (दि.२१) शुभारंभ झाला.



बोनकोडे येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात दर्शन घेऊन आमदार गणेश नाईक यांची निवडणूक प्रचार फेरी निघाली. बोनकोडे गावातील स्थानिक नागरिक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी नगरसेवक लीलाधर नाईक, माजी नगरसेविका वैशाली नाईक, वर्षा नाईक, समाजसेविका वैष्णवी नाईक उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाच्या वतीने ऐरोली विधानसभा मतदारसंघातून आपल्याला दुसर्‍यांदा उमेदवारी दिल्याबद्दल आमदार नाईक यांनी पक्षनेतृत्वाचे आभार मानले.

निवडणुका म्हणजे लोकशाहीचा सोहळा असून प्रत्येकाने त्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले. ऐरोली विधानसभेवर पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकेल, असा विश्वास व्यक्त केला.

# ऑक्टोबरअखेर पावसाची सांगता

**पुणे** : सध्या राज्यात सुरू असलेला पाऊस आता विश्रांती घेणार असून, या मान्सूनची सांगता ऑक्टोबर अखेर होणार आहे, तसेच 'ला-निना' अजूनही दृष्टीपथात नाही, त्यामुळे लगेच थंडीची चाहूल महाराष्ट्रात लागण्याची शक्यता आहे, अशी माहिती सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

येत्या आठवड्याभरात नाशिक, जालना, संभाजीनगर, जळगांव, बुलढाणा, अमरावती, अकोला या भागात थंडीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यात मात्र १ नोव्हेंबरनंतर हळूहळू थंडीत वाढ होऊ शकते.

# खालापूर पं.स. गटविकास अधिकार्‍यांची वडगाव शाळेला भेट

**चौक : प्रतिनिधी**

राजिप उच्च प्राथमिक शाळा वडगावला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यात प्रथम व जिल्ह्यात प्रथम व मुंबई विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त करून १५ लाख रुपये पारितोषिक मिळविल्याबद्दल खालापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी शाळेला भेट दिली. या वेळी विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल उपस्थित होते.




विद्यादान व प्रसारण करणारे शिक्षक आणि विद्या आत्मसात करणारे विद्यार्थी हे एकत्र आल्यावर शिक्षणाचा पाया मजबूत होतो. शिक्षणाचा स्तर अधिक उंच होतो, असे गौरवोद्गार गटविकास अधिकारी संदिप कराड यांनी काढले. शाळेच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन करून मुख्याध्यापक सुभाष राठोड यांचे कौतुक केले.

वडगाव शाळा ही मॉडेल स्कूल म्हणून नावलौकिक मिळवत आहे. या शाळेच्या विकासात अजून काही योगदान देता येत असेल तर नक्की द्यावे. राठोड गुरुजी व सर्व शिक्षक चांगले काम करीत आहेत, असे गटविकास अधिकारी संदिप कराड म्हणाले.

शाळेने राबविलेल्या स्विप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे गटविकास अधिकारी कराड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

# पिंपळपाडा येथे सेनादलाचे कबड्डी प्रशिक्षण शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

सेनादलाच्या वीरमराठा रेजिमेंटच्या कबड्डी सराव शिबिर पेण तालुक्यातील पिंपळपाडा येथे घेण्यात आले. न्यू यंग संघ पिंपळपाडा यांच्या क्रीडांगणावर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराच्या सांगता समारंभाप्रसंगी न्यू यंग संघ पिंपळपाडा संघाने सेना दलाच्या संघाचा सत्कार केला. या वेळी जेएसडब्ल्यू कंपनीचे अधिकारी पेण तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे, कराटे, किकबॉक्सिंगचे आंतराष्ट्रीय खेळाडू व पंच प्रवीण पाटील, सेनादल संघाचे प्रशिक्षक राष्ट्रीय प्रशिक्षक तथा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सदस्य लक्ष्मण गावंड, न्यू यंग संघाचे संस्थापक अध्यक्ष दत्ता पाटील, अध्यक्ष विकास पाटील, खजिनदार सुनील पाटील, उपाध्यक्ष गजानन पाटील, सरचिटणीस हरिश्चंद्र पाटील, कासु माजी सरपंच सुनंदा गांवड, राष्ट्रीय कबड्डी पंच हिरामण भोईर, योगेश पाटील, योगेश टेमकर, धावपटू गजानन भोईर, महेंद्र पाटील, आकाश पाटील आदी उपस्थित होते.

प्रशिक्षण देण्यासाठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय प्रशिक्षक लक्ष्मण गांवड यांची निवड करण्यात आली. या सराव शिबिरास न्यू यंग संघाचे अध्यक्ष विकास पाटील यांनी उत्तम सहकार्य केले, तसेच संघाचे खेळाडू नंदकुमार पाटील, दुर्वास पाटील, गजानन पाटील, विजय भगत सतिष पाटील तसेच अन्य वरिष्ठ खेळाडूंनी मार्गदर्शन केले. सर्वश्री विकास पाटील, चंद्रकांत पाटील, विश्वनाथ पाटील, सुनील पाटील, संदेश पाटील, देवेंद्र भोईर, दत्तात्रेय पाटील, हिरामण भोईर, लिलाधर म्हात्रे, प्रवीण पाटील, जयेश पाटील या सर्वांनी आर्थिक व अन्य स्वरुपात मदत केली.

# अलिबागमध्ये किरकोळ वादातून दोघांवर जीवघेणा हल्ला

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरात मंगळवारी (दि.२२) कामाचा मोबदला मागायला गेलेल्या दोघांवर मालकाने चाकूने हल्ला केला. ही घटना भरदुपारी कामत आळी येथे घडली. घटना घडल्यानंतर आरोपीने पलायन केले. राजेश कारिया असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तालुक्यातील भाल येथील अक्षता दळवी (वय २२) व वायशेत येथील सायली मार्कील (वय २९) या दोघी वर्षभरापासून नादब्रम्ह इडली दुकानात कामाला होत्या. त्यांनी मिळून काम सोडण्याचे ठरविले होते. त्यानुसार त्यांनी कारिया यांना कळविले होते, मात्र दोन दिवसांनी सांगा असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्याप्रमाणे अक्षता, सायली मार्किल व तिचा पती रवींद्र मार्किल चर्चा करण्यासाठी गेले. या वेळी तरुणींनी कामाचा मोबदला मागितला, मात्र कारिया यांनी पैसे पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये देण्यात येईल, असे सांगितले. यावरून त्यांच्यात शाब्दिक मतभेद झाले, तसेच कारिया यांनी अक्षता व रवींद्र या दोघांवर धारदार चाकूने वार केले. यामध्ये त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात औषधोपचार सुरू आहेत.

# तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लोगो मतदानातून निवडणार; मतप्रक्रिया सर्व भक्तांसाठी खुली

**धाराशिव : प्रतिनिधी**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लोगो निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांच्या परीक्षणानंतर पाच लोगोंची निवड करून ते संस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले आहेत. आता मतदान घेऊन नंतर लोगोची निश्चिती होणार असून, यासाठी ३ नोव्हेंबरपर्यंत आपले मत नोंदवावे, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान विश्वस्त सभेतील १२ क्रमांकाच्या ठरावानुसार श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा नवीन लोगो बनविण्याबाबतचा ठराव घेण्यात आला होता. सध्या असणारा लोगो हा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लोगो असल्याबाबत लवकर लक्षात येत नसल्याने किंवा तो तितका आकर्षक नसल्याने नव्याने लोगो तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी स्पर्धा घेऊन, त्यासाठी बक्षीस ठेवून, ईओआय प्रसिद्ध करून त्याद्वारे प्राप्त होणार्‍या डिझाइनमधून आकर्षक डिझाइन निश्चित करून त्याप्रमाणे लोगो तयार करण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली होती.

या लोगोंना नागरिकांना मतदान करता यावे यासाठी हे पाचही लोगो आता श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नवीन लोगो निवडीसाठी नागरिकांनी मतदान करावे, असे आवाहन तहसीलदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

# चोळईत श्रीमरिआई देवी मंदिर जीर्णोद्धार सोहळा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कशेडी घाटातील चोळई गावातील मरिआईदेवी मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा २३ ते २४ ऑक्टोबर रोजी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करून होणार असल्याची माहिती ग्रामस्थ मंडळाकडून देण्यात आली.

सद्गुरू आनंददादा मोरेमाऊली यांच्या हस्ते श्रीमरीआई देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणाार असून मंदिराच्या वास्तूचे उद्घाटन उद्योजक संतोष मेढेकर यांच्या हस्ते होणार आहे, तर कलशारोहण हभप अजितमहाराज गद्रे यांच्या हस्ते होणार आहे. बुधवारी सकाळी श्रीमरिआई देवीच्या मूर्तीची मिरवणूक, महाप्रसाद, जलाधिवास, धन्यधिवास, श्रीमरी आईदेवी भजन ग्रामस्थ मंडळीतर्फे असे कार्यक्रम होणार असून गुरूवारी मंगळपाठ देवांचे आशीर्वाद घेणे, गणेशपूजन पुण्याहवचन, मातृका तसेच ब्राह्ममंडळ शिखादी वास्तूपिठ देवता, नवग्रहादी मंडळ देवता, प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण, मंदिर उद्घाटन, महाप्रसाद, होणार आहे.

# कलोते-मोकाशी येथे ३९ जणांना काविळीची लागण

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कलोते-मोकाशी येथील धरणातील दूषित पाणी प्यायल्याने ३९ जणांना काविळसदृष्य आजाराची लागण झाल्याचे समोर आले आहे. यात २५ लहान मुलांचा समावेश आहे. यातील २२ रुग्ण उपचार घेऊन पूर्णपणे बरे झाले आहेत, तर उर्वरित १७ रुग्णांचे रक्ताचे नमुने तपासणीकरीता पाठविण्यात आले आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये याठिकाणी धनिकांनी येथील फार्महाऊस बांधून पाळीव प्राणी पाळले आहेत. फार्महाउसच्या शौचालयातील सांडपाणी, पाळीव प्राण्यांचे मलमूत्र, विष्ठा या धरणाच्या पाण्यात मिसळत असल्याने पाणी दूषित होत आहे. याकडे ग्रुप ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांमधून होत आहे. या दूषित पाण्यामुळे अनेकांना कावीळ झाल्याने अनेक जण रुग्णालयात उपचार घेत असून याबाबत राजिप आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. आरोग्य विभागाच्या माध्यमातून गेल्या दोन आठवड्यांपासून विशेष आरोग्य मोहीम हाती घेत नागरिकांच्या तपासणी करण्यात येत आहेत.

> **कलोते गावात बरे झालेले २२ रुग्ण असून दोन टीम कार्यरत आहेत. यामध्ये आरोग्य सहाय्यक, आरोग्यसेवक, आशावर्कर, आशासेविका, सामुदाय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी असे एकूण १४ कर्मचारी व अधिकारी दोन आठवड्यांपासून उपाययोजना करीत आहेत. सर्व नागरिकांनी पाणी उकळून, गाळून पिण्याबाबत आवाहन केले असून सर्व नागरिकांनी उपकेंद्र कलोते येथे उपचारासाठी संपर्क करावा. याठिकाणी सर्व औषधे उपलब्ध आहेत.**
>
> **-डॉ. दत्तात्रेय भिसे, जिल्हा साथरोग अधिकारी**

काही लक्षणे आढळल्यास तत्काळ कलोते उपकेंद्रात आपली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### रवींद्र म्हात्रे



**उरण** : तालुक्यातील आवरे येथील रविंद्र मारुती म्हात्रे यांचे शनिवारी (दि.१९)हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधनासमयी ते ४४ वर्षांचे होते. आवरे येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील, एक विवाहित भाऊ, तीन विवाहित बहिणी असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार (दि.२८) खोपटे येथील नाना नानी पार्क येथे तर उत्तरकार्यविधी बुधवार (दि. ३०) आवरे येथील राहत्या घरी होणार आहे.

# विकासाची सर्व कामे जनतेपर्यंत पोहचवून महायुतीला विजयी करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्यकर्त्यांना आवाहन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व विकासाची कामे जनतेपर्यंत पोहचवून महायुतीला विजयी करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी करून असे सांगून एकत्रितपणे काम करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले.

पनवेल मतदार संघात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यादृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांपर्यंत पोहचून आगामी विधानसभा निवडणुकांच्या रणनीतीवर चर्चा करून त्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्याअंतर्गत प्रभाग १६,१७,१८,१९ आणि २०ची बैठक शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात सोमवारी (दि.२१) झाली तसेच ग्रामीण भागातील नेरे, वावंजे, पाली देवद, पळस्पे आणि आजिवलीमध्येही आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठका घेऊन आगामी विधानसभा निवडणुकीची रणनिती आखली.

या बैठकांवेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, ज्येष्ठ नेते नंदू पटवर्धन, तलुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा रत्नप्रभा घरत, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष अमित जाधव, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा कमला देशेकर, युवा नेते दशरथ म्हात्रे, किशोर सुरते, अप्पा भागीत, सरपंच प्रमोद भिंगारकर, आनंद ढवळे, विनोद वाघमारे, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, राजू सोनी, ॲड. मनोज भुजबळ, समीर ठाकूर, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, कल्पना ठाकूर, नवीन पनवेल शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, नवीन पनवेल शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, केदार भगत, संजय भगत, अमित ओझे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस प्रतिभा भाईर, समीना साठी, किशोर सुरते, अप्पा भागित, शिवाजी दुर्गे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस दक्ष

## रूटमार्चसह मतदानासाठी जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत एरिया डॉमिनेशन आणि रुट मार्च पनवेल शहरात तसेच करंजाडे वसाहत परिसरात काढण्यात आला. यासोबतच पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या मार्फत एरिया डॉमिनेशन आणि रुट मार्च पनवेल तालुक्यात काढण्यात आला. या वेळी मतदानासाठी जनजागृती करण्यात आली.

सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या रूटमार्चमध्ये पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह सीआयएसएफचे अधिकारी व कर्मचारी, जवान, आदींच्या पथकाने पनवेल शहर पोलीस



ठाण्याच्या हद्दीतील महत्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परिसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणी येथे पायी भेटी देवून तेथील परिसराची व परिस्थितीची माहिती घेण्यात आली. त्याचप्रमाणे मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

अशाच प्रकारे करंजाडे वसाहतीमध्येसुद्धा पायी भेटी देवून परिसराची माहिती घेण्यात आली तसेच मतदानासाठी जनजागृती करण्यात आली. या वेळी पोलीस अधिकारी, कर्मचार्यांसह पोलीस पाटील आदी सहभागी झाले होते.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्यासह सीआयएसएफचे अधिकारी व कर्मचारी, जवान, आदींच्या पथकाने पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परिसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणी येथे पायी भेटी देवून तेथील परिसराची व परिस्थितीची माहिती घेण्यात आली. त्याचप्रमाणे मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने केळवणे, साई व कासारभाट येथे विशेष अभियान राबवून मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.





**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना भाजपकडून उमेदवारी मिळाल्याबद्दल भाजप गोवा प्रदेश महामंत्री, माजी आमदार दयानंद सोपटे यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत इतर मान्यवर.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवारी (दि.२२) खारघर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना खारघर येथे जाऊन वेगवेगळ्या ठिकाणी ओला कचरा, सुका कचरा एकत्रित गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावून त्यांनी एक स्वच्छतेचा संदेश नागरिकांना दिला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. मनोज यादव, प्रा. शुभम शर्मा व समितीतील सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# पनवेलमध्ये प्रत्येक प्रभागात मोफत शववाहिका

## प्रमिला पाटील यांच्या मागणीला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रामधील नागरिकांची मृत्यूपश्चात अवहेलना होऊ नये, या हेतूने प्रत्येक प्रभागांमध्ये मोफत शववाहिनी देण्याचा निर्णय पनवेल महापालिकेने घेतला आहे. त्या अनुषंगाने पालिकेने पाच शववाहिन्यांची तरतूद केली असून त्यांचा संपर्क क्रमांक पालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी देण्यात आला आहे. माजी नगरसेविका प्रमिला रविनाथ पाटील यांनी याबाबतच्या मागणी केली होती. त्यानुसार पालिकेने दखल मोफत शववाहिनी सुरू केली आहे.

पनवेल महापालिका हद्दीचा विस्तार मोठा असून पनवेल शहरापासून ग्रामीण भागाकडे जाण्यासाठी रुग्णांना व मृत्युपश्चात शव वाहून नेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. तसेच, ज्या हॉस्पिटलमध्ये मृत व्यक्तीचे शव ठेवले आहे, त्या रुग्णालयाच्या आवारातील शववाहिनीचालक मनमानी पद्धतीने भाडे आकारत असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या नागरिकांची मोठ्या प्रमाणावर कुचंबणा होत होती. अशा नागरिकांच्या घरातील व्यक्तीचे निधन झालेले असताना शववाहिकाचालक वाढीव भाड्यासाठी नागरिकांना वेठीस धरत होते. हे प्रकार पनवेलमधील मोठी रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय व कामोठे येथील एमजीएम रुग्णालयाच्या ठिकाणी नेहमी घडत होते. त्यामुळे नागरिकांना या शववाहिन्यांना मनमानी भाडे देण्यापलीकडे पर्याय उरला नव्हता. या संदर्भात रोडपाली प्रभाग क्रमांक सातच्या माजी नगरसेविका प्रमिला रविनाथ पाटील यांनी प्रभागनिहाय रुग्णवाहिका व शववाहिका सुरू कराव्यात, अशी विनंती पनवेल महापालिकेकडे केली होती. त्या अनुषंगाने पनवेल महापालिकेने महापालिका क्षेत्रात खारघर प्रभाग समिती, उपविभाग नावडे, कळंबोली प्रभाग समिती व कामोठे प्रभाग समिती क व पनवेल प्रभाग समिती ड या ठिकाणी पालिकेमार्फत मोफत शववाहिनी सेवा सुरू केल्याने पनवेल पालिका क्षेत्रातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर सोय झाली आहे. त्यामुळे पनवेल पालिका क्षेत्रातील रुग्णालय परिसरातील ठेकेदार रुग्णवाहिका व शववाहिनी चालकांच्या मनमानीला चाप लागणार आहे.

रुग्णसेवेसाठी पनवेल महापालिका नेहमीच कटिबद्ध असून गर्भवती मातांसाठी रुग्णवाहिका व प्रभागनिहाय शववाहिनी चालू केल्यानंतर इतर रुग्णांसाठीच्या संदर्भ सेवेसाठीदेखील लवकरात लवकर ठराव घेऊन रुग्णवाहिका उपलब्ध करण्याबाबत आयुक्तांनी संबंधित विभागास सूचित केले आहे.

### शववाहिनीसाठी संपर्क क्रमांक

**खारघर प्रभाग समिती अ** निखिल कांबळे –१८८२८०८२२५, उपविभाग नावडे लालसिंग राठोड – ९२२२४०१७००, **कळंबोली प्रभाग समिती ब** अंकुश पोपेटा – ९८३३३५२८५०, **कामोठे प्रभाग समिती क** उमेश मढवी –८८२८७७०२१८, **पनवेल प्रभाग समिती ड** रोशन माळी – ८१०८८९३५८५

**पनवेल महापालिका क्षेत्रातील ग्रामीण भागात सर्वसामान्य लोक राहतात. त्यातील बहुतेक जण मोलमजुरी करणारे तसेच हातावर पोट असणारे आहेत. त्यांना अत्यावश्यक काळात खासगी रुग्णवाहिका व शववाहिनी परवडत नाही तसेच रुग्णवाहिका रात्रीच्या वेळी अव्वाच्या सव्वा रक्कम भाडेस्वरूपात मागतात. ही रक्कम शहरातील सर्वसामान्य नागरिकांना परवडत नाहीत.**

**–प्रमिला पाटील, माजी नगरसेविका, पनवेल**



**पनवेल : धानसर येथील जितेंद्र पोरजी यांची भाजप तालुका मंडल अंतर्गत प्रभाग १च्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, संतोष पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची नर्सरीला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व नेचर क्लबने यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२२) कोकण कृषी प्रतिष्ठान नर्सरी भेटीची आयोजन केले होते.

या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी खारघर येथील कोकण कृषी प्रतिष्ठान नर्सरीला भेट देऊन तेथील वेगवेगळ्या उपयोगी औषधी वनस्पतींची माहिती घेतली यामध्ये प्रामुख्याने तुळस, अडुळसा, कोरफड, ब्राह्मी, हळद व ब्रिंगराज अशा वेगवेगळ्या वनस्पतीचा समावेश होता या माहितीचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी हा पर्यावरणीय उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. दीपिका लावंड तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# ट्रेकिंगसाठी गेलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कलावंतीण दुर्ग येथे आपल्या मित्रांसह ट्रेकींगसाठी गेलेल्या एका व्यक्तीच्या छातीत दुखू लागल्याने तसेच चक्कर येवून बेशुद्ध झाल्याने त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारार्थ दाखल केले असता तेथे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

आनंद शहापूरकर (४७ रा.पुणे) हा आपल्या काही सहकार्यांसह पनवेलजवळील कलावंतीण दुर्ग येथे ट्रेकींग करण्याकरिता गेला असताना त्याला अचानकपणे छातीत दुखू लागल्याने तसेच चक्कर येवून बेशुद्ध झाल्याने त्याला त्याच्या सहकार्याने एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारार्थ दाखल केले असता तेथे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरणमध्ये ओणम सेलिब्रेशन

**उरण : वार्ताहर**

उरण द्रोणागिरी ओणम सेलिब्रेशन २०२४ कार्यक्रम रविवारी जेएनपीटीतील हॉल येथे झाला.

कार्यक्रमासाठी प्रदीश चेनॉन, रघुनाथ राघवन, निशा सुधीर व त्यांच्या सहकार्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमात दहावी बारावी उत्तीर्ण झालेल्या मुलांचा सत्कार करून व बक्षीस वितरण करण्यात आले.



कार्यक्रमात थिरुवाथिरा, ओणम डान्स व इतर केरळचे पारंपरिक नृत्य सादर करण्यात आले. यात 'युथ विंग डान्स'ने कार्यक्रमाची शोभा वाढवली. लहानांपासून ज्येष्ठ नागरीकांपर्यंत सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला या कार्यक्रमात सुमारे ४०० केरळी नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय

# जनजागृतीतूनच अटकाव

बालविवाहाचे उच्चाटन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि इतर अधिकाऱ्यांना सूचना जारी केल्या. बालविवाह रोखण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणारी यंत्रणा असावी, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला. मात्र बालविवाह प्रतिबंध कायदा (पीसीएमए) हा 'वैयक्तिक कायद्या'समोर वरचढ ठरेल का याबाबतचा निर्णय संसदेसमोर विचाराधीन असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. 'पीसीएमए' हा कुठल्याही धर्माच्या वैयक्तिक कायद्यापेक्षा महत्त्वाचा मानावा, अशी विनंती केंद्रसरकारने न्यायालयाला केली आहे.

**देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास आठ दशके पूर्ण होत आलेली असतानाही आपण अजून बालविवाहाच्या समस्येवर चर्चा करतो आहोत यातूनच ही समस्या आपल्या समाजात किती खोलवर रुजलेली आहे हे दिसून येते. कायद्यानुसार १८ वर्षांखालची मुलगी आणि २१ वर्षांखालचा मुलगा यांचे लग्न म्हणजे बालविवाह. १९७८ मध्ये विवाहाची वयोमर्यादा १८ आणि २१ केली गेली. गेल्या काही वर्षांमध्ये देशात शिक्षणाचा वाढता प्रसार, शहरीकरण, महिलांचे सबलीकरण आदी कारणांमुळे बालविवाहांचे प्रमाण बरेच घटले आहे, परंतु तरीही आजही देशात वर्षाकाठी जवळपास १५ लाख बालविवाह होतात असे आकडेवारी दर्शवते. बालविवाहाची समस्या शहरी भागांमधील सुशिक्षित वर्गात सहजपणे नजरेस पडत नसली तरी ग्रामीण भागात व शहरी भागांतील शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास समाजांमध्ये आजही मोठ्या प्रमाणात बालविवाह होतात. मागील आर्थिक वर्षात देशातील १७ राज्ये आणि २६५ जिल्ह्यांमध्ये विविध संस्था तसेच पंचायतींच्या प्रयत्नांतून सुमारे ७३ हजार बालविवाह रोखण्यात आले असे राष्ट्रीय बालहक्क आयोगाने म्हटले आहे, परंतु बेकायदा बालविवाहाच्या दाखल गुन्ह्यांची संख्या चार हजारही नाही असेही आकडेवारीवरून दिसते. म्हणजे, बालविवाह हा फौजदारी गुन्हा असला तरी कारवाईच्या दृष्टीने त्याविरोधात पावले कुठल्याही समाजाकडून फारशी उचलली जात नाहीत. मुस्लिम धर्मियांमध्ये बालविवाहाचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून येते. 'मुस्लिम व्यक्तिगत कायद्या'नुसार मुलगी वयात आली की ती विवाहयोग्य झाली असे मानले जाते. हे वय अर्थातच कायदेशीर १८ या किमान वयापेक्षा बरेच कमी असू शकते. संपूर्ण कुटुंबाची शैक्षणिक तसेच सामाजिक-आर्थिक पातळी उंचावली तरच या अशा बालविवाहांना अटकाव होऊ शकतो. मुलगी म्हणजे ओझे मानण्यातून तिच्या जबाबदारीतून कुटुंबांना लवकर मोकळे व्हायचे असते. अनेक ठिकाणी मुलीच्या शिक्षणापेक्षा तिचा उत्तम कुटुंबात विवाह होणे हे अधिक महत्त्वाचे मानले जाते. हे असे विवाह पालकांच्या व कुटुंबियांच्या मर्जीनुसारच होत असल्यामुळे तक्रार कोणी, कुणाविरोधात करायची अशी परिस्थिती असते. बालविवाहानंतर संबंधित अल्पवयीन मुलगी प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल होते तेव्हा अशा घटना उघडकीस येतात. आदिवासी भागांमध्ये जुनाट रूढीपरंपरांमुळे आणि दारिद्र्यामुळे अल्पवयीन मुलींचे विवाह लावून दिले जातात. पंचायत व्यवस्थेत ग्रामसेवक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून काम करतात. अंगणवाडी सेविकाही या कामात साह्य करतात, परंतु ग्रामीण भागातील एकंदर सामाजिक घडीच अशीच असते की मुलगी वयात आली की तिचे लग्न करून मोकळे होण्याचा विचार प्राधान्याने होतो. यासंदर्भातील जागरूकतेचे काम गेली अनेक वर्षे सुरू असले तरी काही मागास समाजांवर त्याचा फारसा प्रभाव अद्याप दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयानेही त्यामुळेच यासंदर्भात जागरूकता वाढवण्यावर भर दिला आहे.**

# आचारसंहितेचे पालन करताना काय करू नये

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यापासून निवडणूक आचारसंहिता लागू होते. जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

**आचारसंहिता कालावधीत काय करू नये पुढीलप्रमाणे**

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष / शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/ निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. तसेच त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील पवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.


**(रायगड जिल्हा माहिती कार्यालय)**

# वैदिक धर्माचे पुरस्कर्ते अहिताग्नी राजवाडे

प्राचीनसंस्कृतविद्येचे संशोधन करणारे, तत्त्वज्ञानाच्या प्रश्नांवर स्वतंत्रपणे विचार करून ग्रंथलेखन करणारे प्रसिद्ध व्याख्याते आणि भारतीय तत्त्वचिंतक शंकर रामचंद्र राजवाडे. अग्निहोत्राचे व्रत स्वीकारल्याने त्यांना 'आहिताग्नी' ही उपाधी प्राप्त झाली. नानासाहेब हे त्यांचे टोपणनाव. आहिताग्नी यांचे सिद्धान्त शांकरमताच्या विरुद्ध आणि अर्वाचीन विज्ञान जमेस धरून मांडलेले आहेत. त्यांनी अद्वैत सिद्धान्ताविरुद्ध 'द्वंद्व' सिद्धान्त आणि द्वंद्वापलीकडील स्थितीला 'अद्वैताऐवजी निर्द्वंद्व' हा शब्द अधिक शास्त्रीय व प्राचीन असल्याचे प्रतिपादिले आहे.

राजवाडेंचा २३ ऑक्टोबर १८७९ रोजी जन्म पुण्यातील एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील (रामचंद्र हरी राजवाडे) ब्रिटिश सरकारच्या लष्करी खात्यात नोकरीस होते. शंकरराव राजवाडे यांचे वयाच्या चौदाव्या वर्षी लग्न झाले. पत्नी पार्वती, आई-वडील, भावंडे असा त्यांचा परिवार होता; परंतु १८९७ ते १९०२ या कालावधीत पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथींमध्ये त्यांच्या धाकट्या भावाचे, वडिलांचे (अन्य आजाराने) व त्यानंतर काही वर्षांनी आईचे निधन झाले. १८९८ मध्ये त्यांनी दुसरे लग्न केले. श्री राजाभाऊ राजवाडे हे आहिताग्नींचे सुपुत्र. शंकरराव राजवाडेंनी १८९७ मध्ये डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व तेथून त्यांनी बी.ए. ही पदवी संपादन केली. याच काळात त्यांच्यावर स्वातंत्र्यलढ्यातील जहाल प्रवाहाचा प्रभाव पडला. तत्कालीन क्रांतिकारकांशी त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता व लोकमान्य टिळकांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा त्यांना पुरेपूर अभिमान होता. टिळकांच्या तेजस्वी नेतृत्वाच्या काळातील अनेक तरुणांपैकी ते एक होते, परंतु तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ते टिळकांना फारसे मानीत नसत. अल्पकाळ ते चाफेकर बंधूंच्या संपर्कातही होते. राजवाडे महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच वडिलांचे आकस्मिक निधन (१९०२) झाल्याने त्यांनी अर्थार्जनासाठी काही वर्षे (१९०२ ते १९०७ पर्यंत) शासकीय सेवा केली. मात्र उर्वरित आयुष्य त्यांनी पूर्णतः विद्याव्यासंगास वाहिले.

इंग्रजीचे उत्तम ज्ञान असूनही राजवाडेंनी केवळ मराठीतून



ग्रंथरचना केली. एखाददुसरा अपवाद वगळता त्यांनी स्वतःच आपले लेखन प्रकाशित केले. त्यांच्या ग्रंथसंपदेमध्ये तत्त्वज्ञानात्मक, वैज्ञानिक तसेच सामाजिक व राजकीय विचारसूत्रांचा मिलाप आढळतो. गीताभाष्य (१९१६) ह्या ग्रंथात त्यांनी आधुनिक ज्ञानाच्या प्रकाशात गीतेच्या पहिल्या तीन अध्यायांची नीतीच्या व समष्टीच्या दृष्टीने चिकित्सा केली आहे. नासदीयसूक्तभाष्यपूर्वार्ध (१९२७) हा त्यांचा दुसरा ग्रंथ. त्यामध्ये ऋग्वेदातील जगदारंभविषयक नासदीय सूक्ताच्या अनुषंगाने पुरुषार्थांचा उलगडा केला आहे. सदर ग्रंथाच्या उत्तरार्धाचे तीन खंड पुढील पंचवीस वर्षांत प्रसिद्ध झाले व त्यांत शरीरशास्त्र, कामशास्त्र, कुटुंबसंस्था इत्यादी विषयांचा ऊहापोह केलेला आढळतो. दरम्यान राजवाडेंनी नीत्शेचा ख्रिस्तांतक आणि ख्रिस्तांतक नीत्शे (१९३१) हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यात द अँटीख्राइस्ट (१८९५) ह्या ग्रंथाचा अनुवाद व नीत्शेच्या तत्त्वज्ञानाची सविस्तर चर्चा समाविष्ट आहेत.

राजवाडेंनी देशभरात शेकडो व्याख्याने दिली. वैदिक धर्म आणि षड्दर्शने अथवा चार विद्या व सहा शास्त्रे (रावबहाद्दूर किनखेडे व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ, १९३८) तसेच सनातन वैदिक धर्म प्रवचनमाला (१९४७) ह्या पुस्तकांद्वारे त्यांतील काही व्याख्याने प्रकाशित झाली. ईशावास्योपनिषद्भाष्य (१९४९) ह्या ग्रंथामध्ये ईश, जगत् आणि जीव ह्यांच्यातील यथोचित संबंध दर्शवून कर्माचा व ज्ञानाचा विचार केला आहे. षड्दर्शनसमन्वय आणि पुरुषार्थमीमांसा (१९४९) हा राजवाडेंच्या हयातीत प्रसिद्ध झालेला त्यांचा अखेरचा ग्रंथ असून त्यामध्ये दर्शनशास्त्रांचे साहचर्य विशद करून मानवी श्रेयसविषयक धर्मकेंद्री भूमिका मांडली आहे. त्यांचे आत्मवृत्त १९८० साली प्रसिद्ध झाले, मात्र झरथुष्ट्री धर्म, ज्योतिष अशा विषयांवरील त्यांचे लेखन अप्रकाशित राहिले.

वैदिक आणि नीत्शेप्रणीत विचारविश्वांची सांगड घालण्याच्या खटाटोपात राजवाडेंनी 'फॅसिस्टवादा'चा पुरस्कार केला. मनुष्यप्राणी स्वभावतः फॅसिस्ट असून प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार स्वहित साधण्यासाठी बलाची कास धरते, असे त्यांनी निक्षून सांगितले. इतर सर्व विचारप्रणाली कृत्रिम आणि दौर्बल्यमूलक असल्याचा त्यांचा दावा होता. फॅसिस्टवाद व समाजवाद ह्यांमध्ये द्वंद्व आहे; परंतु सच्चा फॅसिस्ट त्या पलीकडे जातो. तसेच आदिम अवस्थेत आढळणारा फॅसिस्टवाद, नागरी समाजात उद्भवणारा समाजवाद आणि अतिमानवाच्या कारकिर्दीत अस्तित्वात येणारा परिपूर्ण फॅसिस्टवाद हे मानवी उत्क्रांतीचे प्रमुख टप्पे आहेत, अशी मांडणी राजवाडेंनी केली.

वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी आजारपणामुळे पुण्यातील निवासस्थानी त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### आचारसंहितेचे उल्लंघन होतेय; मग करा 'या' ॲपवर तक्रार!




लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही निवडणूक आयोगाने आचारसंहितेचं उल्लंघन रोखण्यासाठी 'सी-व्हिजिल ॲप' विकसित केले आहे. निवडणूक कालावधीत आचारसंहितेचं उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत कारवाई केली जाणार आहे. विशेष म्हणजे तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवलं जाणार आहे.

प्रशासन आता दिवसेंदिवस डिजिटल होत चाललं आहे. त्यामुळे निवडणूक काळात आचारसंहितेचं कोणाकडून उल्लंघन होत असेल तर बसल्या जागी तक्रारी करता येणार आहेत. एरव्ही आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करू नये, याविषयी निवडणूक आयोगाकडून उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. तरीदेखील आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्यामुळे असे झाले तर त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहचविण्यासाठी निवडणूक आयोगाने सी-व्हिजिल ॲप विकसित केले आहे.

**अशी करा तक्रार**

उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडीओ अपलोड करणे आवश्यक आहे.

**भरारी पथक करेल कारवाई**

* नागरिक या एप्लिकेशनचा वापर करून निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांत पैसे वाटप किवा अन्य चुकीच्या कामांची, घटनांची तक्रार नोंदवू शकतात.

* हे सी-व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडते.

# गायक, संगीतकार व नट पं. राम मराठे

'माणूस', 'गोपाळकृष्ण', 'जागिरदार' असे चित्रपट, 'मंदारमाला', 'जय जय गौरीशंकर', 'संगीत सौभद्र', 'संगीत स्वयंवर' अशा नाटकांतून आपल्या अभिनय आणि गायकीचा ठसा उमटवलेले संगीतभूषण पं. राम पुरुषोत्तम मराठे यांची आज जयंती (जन्म २३ ऑक्टोबर १९२४). यानिमित्ताने मराठी संगीत रंगभूमीवरील एका महत्त्वाच्या कलाकाराच्या भारतीय संगीत रंगभूमीतील योगदानाचा आढावा...



**निमित्त**

रामचंद्र मराठे हे मराठी संगीत दिग्दर्शक, गायक, रंगमंचावरील आणि चित्रपटांमधील अभिनेते होते. बाल कलाकार म्हणून त्यांनी प्रभात फिल्म कंपनीच्या १९३८मध्ये गोपाल कृष्ण या चित्रपटात कृष्णाची मुख्य भूमिका साकारली होती. ते हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या आग्रा घराण्याचे उस्ताद विलायत हुसेन खान यांचे शिष्य होते. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर आणि मास्टर कृष्णरावांच्या माध्यमातून त्यांनी जयपूर, ग्वाल्हेर आणि आग्रा यांसारख्या विविध घराण्यांचे घटक असलेली ख्याल शैली विकसित केली.

पं. राम मराठे यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण भावे शाळेत पूर्ण झाले. ग्वाल्हेर घराण्याचे पं. मनोहर बर्वे, ग्वाल्हेर घराण्याचे पं. मिराशीबुवा, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, जयपूर घराण्याचे पंडित वामनराव सडोलीकर आणि मोगुबाई कुर्डीकर, आग्रा घराण्याचे खान साहेब विलायत हुसेन खान, पूगनाथ घराण्याचे खान साहेब विलायत हुसेन खान यांच्यासह अनेक विद्वानांच्या हातून त्यांनी शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी तबल्याचेही प्रशिक्षण घेतले होते.

१९३३ साली पं. राम मराठे यांनी सागर फिल्म कंपनीत प्रवेश केला. त्यांनी 'मनमोहन', 'जहागीरदार', 'वतन' सारख्या मेहबूब फिल्म्समध्ये काम केले. १९४० पर्यंत ते प्रभातसोबत होते आणि त्यांनी प्रभातच्या अनेक चित्रपटांमध्ये काम केले. पं. राम मराठे यांची हिंदीतील 'आदमी' चित्रपटातील तर मराठीतील 'माणूस' चित्रपटातील भूमिका सर्वांत जास्त लक्षात राहिली. त्यांनी १६हून अधिक चित्रपटांमध्ये बालकलाकार आणि अभिनेता म्हणून काम केले.

पं. मराठे यांनी जालंधर, पाटणा, लाहोर, दिल्ली, ग्वाल्हेर, कलकत्ता, बनारस, अमृतसर अशा विविध ठिकाणी, संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित सर्व संगीत महोत्सवात सहभाग घेतला. १९५०मध्ये नटवर्य गणपतराव बोडस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर यांसारख्या दिग्गज अभिनेते-अभिनेत्रींसोबत 'सौभद्र', 'संजयकल्लोळ', 'स्वयंवर', 'एकच प्याला', 'मानपमान' इत्यादी शास्त्रीय संगीत नाटकांमध्ये प्रमुख पात्र साकारले. त्यांच्या कारकिर्दीत भारतीय संगीत नाटक बहरले. ४ ऑक्टोबर १९८९ रोजी त्यांचे निधन झाले. ठाण्यात त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संगीत नाटक महोत्सवाचे आयोजन केले जाते.

पंडित राम मराठे यांच्या प्रसिद्ध बंदिशी

काहे अब तुम आये हो (राग सोहोनी), जपत जपत गुरू नाम, जियरा रे (राग सोहोनी), बालम तर गैया (राग भीमपलास), बिरज में धूम **(साभार : इंटरनेट)**

## आरोग्य प्रहर

### ताण कमी करण्यासाठी अक्रोड खाणे ठरेल लाभदायी

अक्रोड खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते, जे तुमचे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. अक्रोड खाल्ल्याने मेंदू तीक्ष्ण आणि सक्रिय होतो. अक्रोड हे लोह, फॉस्फरस, तांबे, प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि सेलेनियम यांसारख्या पोषक तत्वांचे भांडार आहे. ड्रायफ्रूटस्मधील



मेंदूच्या आकाराचे अक्रोड हे अतिशय गुणकारी आहे. यामध्ये भरपूर प्रमाणात असलेले ओमेगा ३ मेदाम्ल हे अँटिऑक्सिडंट असल्याने त्याचा शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो.

संशोधकांच्या म्हणण्यानुसार अक्रोड आणि अक्रोडाचं तेल या दोन्हींचा उपयोग ताण कमी करण्यासाठी होतो.

* अक्रोड आहारात असतील तर ज्याचं वजन जास्त आहे, अशांना फायदा होतो. रक्तवाहिन्या चांगल्या स्थितीत राहतात.

* अक्रोडातील ९० टेफेनॉल्स त्याच्यावरील पातळ सालीत असतात. फ्लेवनॉईडसमुळे अँटिऑक्सिडंट गुणधर्म वाढतात, त्यामुळे अक्रोड खाताना या सालीसकट खावा. शक्यतो पाण्यात भिजत ठेवून पूर्ण भिजला की खावा. पाण्यात भिजवल्यावर त्यातील प्रथिनांचे रेणू शोषून घेतात.

* अक्रोडातील भरपूर प्रमाणात असलेलं 'इ' जीवनसत्त्व एका वेगळ्या स्वरूपात म्हणजे गॅमा टोकोफेरॉल या रसायनाच्या स्वरूपात असतं. खास करून पुरुषांच्या हृदयाच्या आरोग्यास यामुळे हातभार लागतो.

* अक्रोड आहारात असल्याने तंतू, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, तांबे यांचाही लाभ झाल्याने संधिवातालाही प्रतिबंध होण्यास मदत होते. अक्रोडामध्ये आणखी असे गुणधर्म आहेत, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधील लवचीकता टिकून राहते.

* अक्रोड मेंदूसाठीही उत्तम समजला जातो, यामुळे रक्तात गाठी होण्याचं प्रमाण कमी होतं.

**अक्रोडचे तेल**

अक्रोड पूर्णपणे वाळून त्याची पेस्ट करून ती भाजून मग त्यापासून तेल काढलं जातं. ते सुंदर तपकिरी रंगाचं असतं. या तेलात एलॅजिक आम्ल हा अँटिऑक्सिडंटचा स्रोत असतो, यामुळे कर्करोगाला प्रतिबंध होतो.

* रक्ताभिसरण उत्तम राहण्यास, रक्तवाहिन्या लवचीक राहण्यास, हृदयविकारास प्रतिबंध होण्यास, संधिवातास प्रतिबंध होण्यास या तेलाचा चांगला उपयोग होतो.

* या तेलातील 'ब' जीवनसत्त्वाचे प्रकार आणि 'इ' जीवनसत्त्व यामुळे त्वचेचा पोत सुधारतो. त्वचेवरील सुरकुत्या, अकाली वार्धक्य, एक्झिमा, सोरायसिस यावर अक्रोडाच्या तेलाचा चांगला उपयोग होतो.

**क्लिक...क्लिक...!**



**कोल्हापूर : पट्टणकोडोलीमधील विरदेव यात्रेचे दृश्य टिपले आहे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी.**

# मुंबई-गोवा महामार्गावर रासायनिक टँकरला आग

## वाहतूक ठप्प; बचाव पथक, अग्निशमन दलाकडून आटोक्यात



**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर मोठी दुर्घटना टळली. ज्वलनशील रसायन भरलेल्या टँकरने अचानक पेट घेतला, मात्र चालकाच्या प्रसंगावधामुळे व स्थानिक बचाव पथक आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे ही आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. या वेळी येथील वाहतूक काही काळ थांबविण्यात आली होती.

गुजरातमधील अदानी हाझिरा पोर्ट लिमिटेड कंपनीच्या एसीएन लिक्विड भरलेला टँकर मुंबई-गोवा महामार्गवरून चिपळूण येथील लोटे परशुराम एमआयडीसीत जात होता. या वेळी सोमवारी (दि.२१) रात्री ७.३० ते ८वा.च्या दरम्यान भुवन गावनजीक रस्ता दुभाजकाजवळ चालक रामदान याने वेग कमी करण्यासाठी ब्रेक दाबला, परंतु ब्रेक व क्लचमध्ये काहीतरी बिघाड झाल्याचे जाणवल्यामुळे चालकाने रस्त्याच्या बाजूला टँकर थांबवून पाहिले तेव्हा टँकरच्या मागील बाजूस आग लागल्याचे दिसून आले.

त्यानंतर चालकाने घोटवळ गावाच्या स्टॉपवरील पंजाबी ढाबा हॉटेलमध्ये जाऊन उपस्थितांना घटनेची माहिती दिली. तेथील ग्रामस्थांनी रेस्क्यू टीमच्या सागर दाहिंबेकर या तरुणाला कॉल करून याबाबत माहिती दिली. क्षणाचाही विलंब न करता टीम एसव्हिआरएसएस कोलाड व फायर ब्रिगेड धाटाव एमआयडीसी घटनास्थळी पोहचले. त्यांनी रात्री १०.३०वा.च्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळविले. रामदान ड्रायव्हरच्या चलाखीने मोठा अनर्थ टळला.

# जमीन लाटण्यासाठी सातबाऱ्यांमध्ये हेराफेरी

## चार जणांविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**




तालुक्यातील सोनखार गावच्या हद्दीत असलेल्या २३ सातबाऱ्यांमध्ये नावाचे साधर्म्य साधून १९९०मध्ये मृत झालेल्या व्यक्तीला १९८३ साली मृत झाल्याचे दाखवून सातबाऱ्यांवर मुद्रांक विक्रेत्याच्या सहाय्याने हेराफेरी करून करोडोंची जमीन लाटण्याचा प्रकार मूळ मालकाच्या तक्रारीनंतर उघडकीस आला आहे. याबाबत सागरी पोलीस ठाणे दादर येथे गुन्हा दाखल झाला आहे.

खार दुतर्फा बोर्ली येथील एफआयआरमध्ये दाखल असलेले २३ सातबारे तक्रारदाराच्या वडिलोपार्जित मिळकत असून तक्रारदाराचे आजोबा कै. जाव्हेरचंद चंद्रभान मारवाडी यांच्या नावे होती. त्यांचा मृत्यू १४ एप्रिल १९५१रोजी झाला. त्यानंतर वारसा हक्काने तक्रारदाराचे वडील अस्सलचंद जाव्हेरचंद मारवाडी यांच्या नावे नियमानुसार सातबारे झाले, मात्र तक्रारदाराचे वडील अस्सलचंद मारवाडी यांचा मृत्यू ११/७/१९९० रोजी झाला.

तक्रारदार व्यवसायानिमत्त मुंबईकडे असल्याने वारस नोंद करणे राहून गेले.

मधल्या काळात कोरोनो आल्याने सातबारे काढणे राहून गेले आणि त्याचाच फायदा घेऊन नावाचा साधर्म्य दाखूवन ४३६२ या फेरफार नंबरने तक्रारदारांच्या मालकीचे २३ सातबाऱ्यांमधील मूळ मालकाचे नाव बदलून जयंतीलाल जाव्हेरचंद मारवाडी उर्फ जैन, प्रेमा बाबूलाल राठोड, मिना घिसुलाल जैन आणि तनिश्क प्रविण मारवाडी उर्फ जैन यांची नावे लावण्यात आली.

तक्रारदारांच्या वकीलानी सातबाऱ्यामध्ये झालेला फेरफार शोधल्यावर समोर आलेली माहिती ही थक्क करणारी होती. आरोपींना या बाबीची खबर लागताच नोटरी करून मूळ मालकाच्या नावे २३ सातबाऱ्यांची मिळकत देण्यासाठी प्रयत्न सुरू केले, परंतु जो तोतीया जाव्हेरचंद मारवाडी होता त्याने मूळ मालकाच्या व्यवस्थापकाकडे दोन कोटींची मागणी केली. त्या वेळी मात्र तक्रारदार संपतराव अचलचंद मारवाडी उर्फ बोकारीया याने सदरचे प्रकरण अलिबाग आर्थिक गुन्हे शाखेकडे दिले.

आर्थिक गुन्हे शाखेने चौकशी केल्यानंतर दादर सागरी पोलीस ठाणे पेण येथे जयंतीलाल जाव्हेरचंद मारवाडी, प्रेमा बाबूलाल राठोड, मिना घिसुलाल जैन, तनिश्क प्रविण मारवाडी व हबीब इब्राहिम खोत (मुद्रांक विक्रेता) यांच्याविरूद्ध भादंवि संहिता १८६० कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२० बी अन्वये गुन्हा दाखल केला. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिता अथणे आर्थिक गुन्हे शाखा अलिबाग रायगड हे करीत आहेत.


**नमुना एन. डी.**

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/M-CAR/2019/160 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BF27905 चे मालक **रामदास शिवराम पाटील** यांचे तारीख १०/०१/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी वंदना रामदास पाटील, पत्ता रा s/o मु. तारा, पो बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - वंदना रामदास पाटील**
**पत्ता- मु. तारा, पो बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१**


# 'पोलीस पाटीलांनी गावात कायदा सुव्यवस्था राखावी'

**चौक : प्रतिनिधी**

गावपातळीवर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी गाव पोलीस पाटील यांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी केले आहे.

खालापूर पोलीस ठाण्यात वार्षिक तपासणी अहवाल आणि पोलीस ठाण्याची पाहणी करण्यासाठी अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे आले होते. त्या वेळी गाव पोलीस पाटील यांना संबोधीत करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, आपल्या गावात होणाऱ्या वाईट घटनांचा परिणाम हा दूरवर जातो आणि त्यामुळे त्याचे वाईट परिणाम होत असतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर घडणाऱ्या प्रत्येक घटनांचा आढावा घेणे आवश्यक आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीबाबत त्यांनी सूचना केल्या. गाव पोलीस पाटील यांची कार्यपद्धतीबाबतदेखील त्यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस पाटील उपस्थित होते.




**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) अन्वये जाहिर नोटीस**

चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार,
श्री रजनिगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
भुखंड क्र. २१६ व २१७, सेक्टर-०४, नवीन पनवेल — अर्जदार

विरुध्द

०१) मे. पटेल कंनस्ट्रक्शन तर्फे भागीदार
१. श्री. इक्बाल के. लतिफ पटेल (मयत)
यांचे वारस श्री. सुफियान बुद्दीन
२. श्री. अब्दुल रज्ञाक मो. हुसेन पटेल
पत्ताः- मु.पो.तळोजा ता. पनवेल जि. रायगड
०२) मा. व्यवस्थापक (शहर सेवा -२)
सिडको लि, सिडको भवन, पाहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई — जाब देणार

श्री रजनिगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भुखंड क्र. २१६ व २१७, सेक्टर-०४, नवीन पनवेल या संस्थेचा महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) बाबतचा अर्ज दिनांक १४/०२/२०२४ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला होता.

सदर अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयात उभय पक्षकारांची संयुक्त सुनावणी दिनांक २५/४/२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सदर सुनावणीची प्रतिवादी क्र. ०१ (श्री. इक्बाल के. लतिफ पटेल) यांना बजावलेली नोटीस ते मयत असल्याच्या शे-यासह परत आली होती. सबब मयत पक्षकाराचे वारसाचे नावासह फेर अर्ज सादर करणेबाबतच्या सुचना अर्जदार संस्थेस देण्यांत आल्या होत्या.

अर्जदार संस्थेच्या वकीलांनी दिनांक ३०/८/२०२४ रोजीच्या अर्जाने मयत पक्षकार (श्री. इक्बाल के. लतिफ पटेल) यांच्या वारसाचे नांव या कार्यालयास सादर करुन याबाबत पुढील सुनावणी घेणेबाबत विनंती केली आहे.

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.
२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.
३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी **दिनांक ०८/११/२०२४ रोजी सकाळी/दुपारी १२.०० वाजता** निश्चित करण्यात येत आहे.
४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) आपणास सुनावणीचे वेळी पुर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.
६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्या वतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.
७) सदर प्रकरणी मयत पक्षकारांचे वतीने त्यांचे वारसास पक्षकार म्हणून समाविष्ठ करणेत यांवे.

**सही/-**
**सहनिबंधक**
**सहकारी संस्था, सिडको, नवीमुंबई**

**दिनांक: २३/१०/२०२४**


# सुदाम पवाळी, उल्हास भुर्के स्वगृही आल्याने बळकटी -आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

आमच्यातील काही महाभागांनी आमच्यात मतभेद निर्माण केले होते. त्यामुळे काही काळ बाजूला झाले होते, मात्र सुदाम पवाळी आणि उल्हास भुर्के, अमोल पाटील, रवी ऐनकर यांच्याबरोबरच काही शिवसैनिक स्वगृही आल्याने शिवसेना अधिक बळकट झाली आहे. या मतदारसंघात बाळासाहेबांचा भगवा पुन्हा फडकवत ठेवायचा आहे. यासाठी सर्वांनी सज्ज व्हा, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहात पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, जिल्हा संपर्कप्रमुख विजय पाटील, हनुमंत पिंगळे, उपजिल्हा प्रमुख भाई गायकर, विधानसभा संघटक शिवराम बदे, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, खालापूर तालुकाप्रमुख संदेश पाटील, विधानसभा युवा सेना प्रमुख प्रसाद थोरवे, युवा सेना तालुका अधिकारी अमर मिसाळ, पंकज पाटील, महिला आघाडी सल्लागार सुरेखा शितोळे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे आदी उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस उल्हास भुर्के, शिवसेना ठाकरे पक्षाचे माजी तालुका संपर्कप्रमुख सुदाम पवाळी, कडाव सरपंच करुणा पवार, अमोल बांदल, ठाकरे पक्षाचे विभाग प्रमुख रवी ऐनकर, रमाकांत जाधव, योगेश पोथरकर, माजी सरपंच उमेश गायकवाड, ठाकरे पक्षाचे शाखाप्रमुख गावंड वाडी, पेटारवाडीतील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. सुदाम पवाळी यांना कर्जत तालुकाप्रमुख म्हणून, तालुकाप्रमुख असलेल्या संभाजी जगताप यांची जिल्हा संघटक, तर उल्हास भुर्के यांची उत्तर रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली.

सुदाम पवाळी यांनी, पक्षप्रवेश करताना ज्या ज्या मंडळींनी सहकार्य केले आहे त्यांचे ऋण कधीही विसरणार नाही, असे स्पष्ट केले. अमोल पाटील यांनी, आमदार महेंद्र थोरवे कर्जतचे नंदनवन करणारा आमदार म्हणून त्यांची ओळख आहे, असे सांगितले.


**MAAULI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.**
Plot No. -19, Sector -01, Khanda Colony, New Panvel (W) - 410206

**TENDER NOTICE FOR REDEVELOPMENT**

Sealed Tenders/Offers are invited by Maauli Co-operative Housing Society Ltd, Plot No. 19, Sector-1, Khanda Colony, New Panvel (W)– 410 206:

| | |
|---|---|
| Name of Organization | Maauli Co-Op Housing Society Ltd. |
| Name of Work | Proposed redevelopment of Existing Building Maauli CHS Ltd., Plot No. -19, Sector – 01, Khanda Colony, New Panvel (W) – 410206. Having Plot Area 1519.76 sq.mt. |
| Cost Of Tender Document | **Rs.20,000/-** (Twenty Thousand Only) By D.D. (non-refundable) In favour of Maauli Co-Op Housing Society Ltd. |
| Date of issue and sale of offer/Tender Document | From **- 07th October 2024 Extended upto 30th October 2024** Time: **11:00AM to 4:00PM** At Society Office |
| Last Date of Submission for Bid/Tender | **11 November 2024, till 05:00 PM**. At Society Office |

The Society has reserves right to reject any or all bids without assigning any reason.

*Project Management Consultant.*

**Urbann Analysis and Solution P. Ltd.**
Shelton Sapphire, A-1306-09, Plot No. 18 &19, Sector 15, CBD Belapur, Navi Mumbai, Maharashtra 400614.
Tel: 022 – 40136470

**Maauli Co-op Housing Soc. Ltd.**
Plot No. -19, Sector – 01, Khanda Colony, New Panvel (W) – 410206.
Contact Details:
9029846514 (Mr. Shivaji Kadam -Chairman)
9869790066 (Mr. Vinod Malale -Secretary)
8169827128 (Mr. Shankar Naik -Treasurer)
Place: Khanda Colony, New Panvel


# रोहा ओबीसी जनमोर्चातर्फे सुरेश मगर यांचा सत्कार

**रोहे : प्रतिनिधी**

ओबीसीमध्ये महाराष्ट्रात ३५०पेक्षा जास्त जातींचा समावेश आहे. खासदार सुनील तटकरे, ना.आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे माध्यमातून माझी शामराव पेजे इतर मागसवर्गीय आर्थिक विकास महामंडळावर संचालक म्हणून नियुक्ती झाली आहे. जास्तीत जास्त कर्ज व अनुदान ओबीसी बांधवांना मिळण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन, असे आश्वासन ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर यांनी दिले.

रोहा तालुका ओबीसी जनमोर्चाच्या वतीने सुरेश मगर यांचा जाहीर सत्कार कुणबी भवन येथे सोमवारी (दि.२१) करण्यात आला. त्या वेळी सुरेश मगर बोलत होते. या वेळी ज्येष्ठ नेते मारूतीराव खरीवले, माजी जि.प. सदस्य नंदकुमार म्हात्रे, पं. स. माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, कुणबी समाज जिल्हा सरचिटणीस शिवराम महाबळे, ओबीसी जनमोर्चा रोहा तालुका अध्यक्ष अनंत थिटे, तळा तालुकाध्यक्ष सचिन कदम, माजी उपनगराध्यक्ष काशिनाथ धाटावकर, महेश कोलटकर, ज्ञानेश्वर साळुंखे, युवक अध्यक्ष लक्ष्मण मोरे, अमित मोहिते, नवनीत डोलकर, उत्तम नाईक, शशिकांत कडू, सुहास खरीवले, निवास खरीवले, प्रेषीत बारटक्के, अरविंद मगर, संतोष देवळे, शाम लोखंडे, महेश तुपकर, नरेंद्र सकपाळ, गणेश खरीवले, मोरेश्वर खरीवले, चंद्रकांत भगत, लक्ष्मण जंगम, महेश बामुगडे, यशवंत हळदे आदींसह ओबीसी बांधव उपस्थित होते.



# पोलादपुरातील व्यक्तीचा आडवाटेवर मृतदेह



**पोलादपूर** : शहरातील व्यक्तीचा सोमवारी कुंभळवणेतील आडवाटेवर मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि.२२) उघडकीस आली. मृतदेहालगतच एक मेलेला सापही आढळल्याने सर्पदंशाने त्याचा मृत्यू झाला असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

शहरातील तांबडभुवन भागात हेअर कटींग सलून चालविणारे विष्णू कदम हे सोमवारी त्यांची कोसमवाडी भागात गेले होते. ते रात्री घरी परत न आल्याने त्यांच्या भावाने अनिल पवार यांच्या मदतीने मंगळवारी सकाळपासून विष्णूचा शोध घेतला. एका व्यक्तीने त्यांना कुंभळवणे गावाच्या हद्दीतील आडवाटेने परत येताना एक जण पायवाटेवर आडवा पडला असल्याचे दिसले. अनिल पवार आणि विष्णू कदम यांच्या भावाने आडवाटेकडे जाऊन पाहिले असता, ते विष्णू कदम असल्याची खात्री पटली. मृत विष्णूच्या प्रेतालगतच एक मेलेला साप आढळून आल्याने सर्पदंश झाल्याने त्या सापाला मारल्यानंतर विष्णूदेखील मृत झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. पोलादपूर पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयामध्ये पाठविले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२४ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देणेत येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवणेत आलेल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडणेची आहे. प्रत्येक स्टॉल हा १० द १० आकाराची राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

| अ.क्र. | नोड | आरक्षण | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल(पू.) | प्ले ग्राऊंड | २ए | ३६ | ८७६४.५४ |
| २) | पनवेल(प.) | दैनिक बाजार | ७ | बी १९ ए | ५५७.७० |
| ३) | | सामाजिक सेवा केंद्र | ८ | १४ | १८८६.३३ |
| ४) | कळंबोली | प्ले ग्राऊंड | १ | २८ | ३३३९२.११ |
| ५) | | दैनिक बाजार | ५ई | ११ | ६४९.५७ |
| ६) | | दैनिक बाजार | १४ | ५३ ए | ३०३.२५ |
| ७) | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ ए | १४९१.०४ |
| ८) | | दैनिक बाजार | १२ | F/४३ ए | १७६.२७ |
| ९) | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४९७६.८६ |
| १०) | | दैनिक बाजार | ३६ | २४ | ६१९.२० |
| ११) | | दैनिक बाजार | १७ | २६ | ५५२.२८ |
| १२) | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+११४ | ६६७१.५९ |

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी सबंधित इच्छुकांनी फटाके विक्री धारकांनी दिनांक ३१/१०/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, ही संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/माव्य/२४२४/प्र.क्र. १७/५३२/२०२४**
**दिनांक :-२२/१०/२०२४**

**सही/-**
**वैभव विधाते**
**उप आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-वाजे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : वाजे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| वाजे | श्री. गजानन सखराम मसणे | १९७/१ | ०.६९.००<br>०.०९.१०<br>०.७८.१० | ८.६९ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: २२/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
**पत्ता- शॉप नं. ०३, हाउस नं. ४४४, सेक्टर ३, बेलपाडा, साई मंदिर जवळ, खारघर, नवी मुंबई ४१०२१०**

# आयकर कॉलनीचे होणार पुनर्निर्माण

## नागरिकांची त्रासातून मुक्तता

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खंडररूपी धोकादायक आणि जीर्ण अवस्थेतील आयकर कॉलनी वसाहतीचे आता पुनर्निर्माण होणार आहे.

मागील दहा वर्षांपासून बेलापूर येथील इन्कम टॅक्स इमारतीत बेकायदा अनैतिक धंदे, गर्दुल्ले, चोर यांच्या वावरामुळे आयकर नागरिक त्रस्त होते. आता येथील वसाहत जमीनदोस्त करण्यात आल्याने मागील दहा वर्षांपासून राहत असलेल्या आयकर कॉलनीतील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

पारसिक हिल डोंगररांगाच्या कुशीत वसलेल्या बेलापूर सेक्टर २१ आणि २२ मध्ये सिडकोने १९९६ साली इन्कम टॅक्स या केंद्रीय शासन आस्थापनाला ए टाईप आणि सी टाईप इमारती विक्रीने दिल्या. सुरुवातीला येथे इन्कम टॅक्स कर्मचारी निवास करत होते, मात्र येथील इमारतीच्या बांधकामाच्या तक्रारी वाढू लागल्याने दहा वर्षांपूर्वी येथील कर्मचारी



राहते घर सोडून इतरत्र गेले. मुळातच हा परिसर गर्द हिरवाईने नटलेला आहे. सर्व इमारती निर्मनुष्य झाल्याने झाडे-झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली, घरांचे रूपांतर खंडारात झाल्याने काही घरांचा ताबा अनैतिक घटकांनी घेतला. या घरात भिकारी, गर्दुल्यांचा वावर वाढला. भंगार चोर दिवसाढवळ्या इमारतीत शिरकाव करून लाकडी दरवाजे, खिडक्या, लोखंड, नळ आदी वस्तू घेऊन पसार होत होते.

या घटकांचा त्रास आयकर कॉलनीतील बी टाईप, डी टाईप आणि एफ टाईपमधील नागरिकांना होत होता. रात्रीच्या वेळी चोऱ्या होत होत्या. हा परिसर गर्द झाडीने वेढलेला असल्याने साप, विंचू अजगर आदींची भीती स्थानिक नागरिकांना होती. येथील इन्कम टॅक्स वसाहत संबंधित प्रशासनाने आता पुर्णतः जमीनदोस्त केल्याने आयकर कॉलनीतील नागरिकांची आता असामाजिक घटकापासून सुटका झाली आहे.

> **इन्कम टॅक्सच्या धोकादायक आणि जीर्ण झालेल्या इमारतीत वर्षानुवर्षे असामाजिक घटकांचा मुक्त वावर मोठ्या प्रमाणात होता. याचा त्रास आयकर कॉलनीतील नागरिकांना होता. येथे एमईएस विद्या मंदिर हायस्कूल आहे. येथील शालेय मुलींनाही असुरक्षित वाटत होते. इमारती जमीनदोस्त झाल्यावे नागरिकांत समाधान आहे.**
> **-सुभाष गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते**

# मोकाट जनावरांचा वाहनचालकांना अडथळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेलमध्ये ग्रामीण भागांतील रस्त्यावर मोकाट जनावरांचा सुळसुळाट वाढला असून वाहनचालकांना त्याचा खूपच त्रास होत असल्याचे दिसून येत आहे.

रोडवर मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. त्याचा त्रास येथील वाहनचालकांना होत आहे. या मार्गावर दुचाकी, इको रिक्षा, रिक्षा, टेम्पो व चार चाकी वाहने यांची तर रांगच असते, या मार्गावरून जाणारी सर्वच वाहने जोरदार गतीने पुढे जात असतात. ही मोकाट जनावरे रस्त्याच्या कडेला, तर कधी मध्यभागी बसून असतात, तर उभी असलेली जनावरे कधी दिशा अगर मार्ग बदलतील हे सांगता येत नाही, त्याची जास्त भीती दुचाकी, रिक्षा व एको या गाड्यांना आहे.

नांगरणी काम झाल्याने बैलदेखील मोकाट सोडले आहेत. येथे अपघात झाल्यास जनावरांचा मालक गाड्यांचा पाठलाग करताना दिसतात. गाडी चालक भेटल्यास जनावरांची भरपाई वसूल करण्याचा प्रयत्न होतो. मोकाट जनावरे चुकवताना वाहन चालक यांच्याही जिवावर बेतले जाते, ही मोकाट जनावरे, जनावरे चोरी करून ती कत्तल खाण्यात पाठवली जातात, मोकाट जनावरे यांची चोरी करण्यास चोरांना संधी मिळते. त्याचप्रमाणे शेतीला फुलोरा येण्यास सुरुवात झाली आहे, ही मोकाट जनावरे शेतीचे नुकसान करतात, त्यामुळे शेतकरी यांनी केलेली मेहनत फुकट जाते. त्यामुळे या जनावरांच्या मालकांचा शोध घेऊन त्यांना समज द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी आणि वाहनचालक यांची आहे.

## निवडक

### लोकशाही दिनाची बैठक नाही

**नवी मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याबाबतची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४पासून लागू झालेली आहे. त्यामुळे शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रकानुसार ११ नोव्हेंबर २०२४ रोजीची विभागीय लोकशाही दिन बैठक आयोजित करता येणार नाही तसेच आचारसंहिता समाप्तीबाबतचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पुढील प्रस्तावित विभागीय लोकशाही दिन बैठक आयोजित करता येणार नाहीत, असे विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### महेश साळुंखे यांना सन्मानपत्र



**पनवेल :** भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कमिटी पनवेल यांच्या वतीने स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांना राज सदावर्ते यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. महेश साळुंखे हे आंबेडकरी चळवळीमध्ये गेली वीस वर्ष कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कमिटी पनवेलच्या वतीने त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

### मालगाडीचा धक्का लागून एकाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वे रूळ क्रॉस करीत असताना मालगाडीचा अचानक धक्का लागल्याने दगडावर पडल्याने डोक्याला जबर जखम होवून त्यात एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पोयंजे गावाच्या हद्दीत घडली आहे. सुकुराम (वय ४५) हे रेल्वे पटरी क्रॉस करीत असताना पनवेलहून कर्जतकडे जाणाऱ्या मालगाडीचा त्यांना अचानक धक्का लागल्याने दगडावर पडल्याने डोक्याला जबर जखमी होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बबन पाटील यांना विश्रांतीचा सल्ला

**पनवेल :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख तथा पनवेल उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन पाटील हे गेले कित्येक दिवस कोपरखैरणे येथील कोकीलाबेन धीरुबाई अंबानी रुग्णालयात दाखल होते. नुकतीच त्यांच्यावर शस्त्रक्रियादेखील करण्यात आली होती. त्यानंतर ते सुखरुपपणे घरी परतल्याने कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि. २१) बबन पाटील यांना रुग्णालयातून सोडण्यात आले. त्यांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला आहे.

# नैसर्गिक संकटांमुळे भातशेती ठरतोय तोट्यातील व्यवसाय!



**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

परतीचा पाऊस हस्त नक्षत्र संपूनदेखील अजून थांबण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे हातातोंडाशी आलेले भातपीक वाया जाऊन नुकसान होत आहे. त्यामुळे उरण पूर्व भागातील शेकडो एकर भातशेती धोक्यात आली आहे.

दरम्यान, येथील भातशेती कापणी झोडणीसाठी तयार झाली आहे. ठिकठिकाणी शेतकरी कापणी झोडणीच्या कामाला लागले आहेत, मात्र सायंकाळी परतीचा पाऊस बरसत असल्यामुळे कापलेल्या पिकांची नासाडी होत आहे. उरण तालुक्यातील शेतकऱ्यांचे भात हे एकमेव नगदी पीक आहे. उरणच्या पश्चिम भागात औद्योगिककरणामुळे भातशेती नामशेष झाली असली तरी उरणच्या पूर्व भागात आजही शेकडो एकर शेतीत शेतकरी भाताचे पीक घेत आहेत. वाढती महागाई तसेच मजुरांचे दर वाढल्याने भातशेती सध्या तोटचात चालली आहे.

> **भातशेती सध्या तोट्यातील व्यवसाय झाला आहे. त्यातच अशा नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. परिणामी भातशेतीला पर्यायी व्यवसाय शोधण्याची वेळ आता आली आहे.**
> **-के.बी.ठाकूर, शेतकरी, चिरनेर**

तरीही आपल्या कुटुंबाच्या उपजिविकेसाठी शेतकरी भात पीक घेत आहेत. येथे उच्च प्रतीचा तांदूळ मिळत असल्याने अनेक शेतकरी खर्च करून भाताच्या वाणांची लागवड आवडीने करतात.

यावर्षी चांगला पाऊस पडल्यामुळे भात शेती जोमदार झाली आहे. त्यामुळे शेतात चांगले पीकसुद्धा आले आहे, मात्र सायंकाळी हजेरी लावत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असून, शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पाऊस थांबला तर भात कापणी, झोडणीच्या कामाला जोरदार सुरुवात होईल आणि अवघ्या काही दिवसात या पिकांची कापणी झोडणीची कामे पूर्ण होतील, असे येथील शेतकरी विनोद परदेशी यांनी सांगितले.

दरम्यान, कापणी, बांधणी, झोडणीच्या कामाला पावसामुळे अडथळा येत असून शेतकरी या नैसर्गिक संकटामुळे हवालदिल झाला आहे.



**पनवेल : उद्योजक संकेत शेट्ये यांना वाढदिवसानिमित्त कोकण म्हाडाचे माजी सभापती व भाजप नेते बाळासाहेब पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पत्रकार संजय कदम यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : नवनिर्वाचित भाजप आमदार विक्रांत पाटील यांच्यासह कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांचा विशेष सत्कार शिवसेना उपमहानगरप्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, खंडेश धनावडे यांच्यासह इतर पदाधिकारी यांनी केला.**

# पनवेलच्या महिला करणार पर्यावरण संवर्धनासाठी काम

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेलच्या एका गृहनिर्माण संस्थेतील महिलांच्या गटाने त्यांच्या इमारतीतील दारूच्या दुकानाविरोधातील मोहीम यशस्वी झाल्यानंतर, पर्यावरणीय कारणांवर काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

सुरुवातीला, एनके हेरिटेज सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य वापरलेल्या इलेक्ट्रिक बल्बपासून लिथियम बॅटरीपर्यंत ई-कचरा एका समर्पित लाल डब्यात गोळा करण्यास सुरुवात करतील.

हा निर्णय रविवारी सोसायटी सदस्यांनी आयोजित केलेल्या आभार



प्रदर्शनात घेण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते बी.एन. कुमार, अलर्ट सिटिझन्स टीमचे निमंत्रक यांनी एकत्रित मोहिमेद्वारे सरकारकडे हा मुद्दा उचलून धरण्यास पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कुमार, जे नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे प्रमुखदेखील आहेत त्यांनी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांना पर्यावरणीय समस्यांकडे त्यांच्या नवीन-उर्जेचा वापर करण्यास प्रभावित केले. १४ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय ई-कचरा दिनाच्या अनुषंगाने एनजीओची आठवडाभर चाललेली 'लिथियम राक्षसापासून सावध रहा' मोहीम समजावून सांगितली.

सदस्यांनी लगेचच या कल्पनेला सहमती दर्शवली आणि घनकचरा वेगळे करून ई-कचरा गोळा करण्यास सुरुवात केली, असे सोसायटीचे अध्यक्ष अनुराग शुक्ला यांनी सांगितले. ई-कचरा योग्य विल्हेवाट लावण्यासाठी सरकारी प्रमाणित रिसायकलकडे सुपूर्द केला जाईल, असे कुमार म्हणाले.

त्यांच्या इमारतीतील दारू दुकानाविरुद्धच्या मोहिमेच्या यशाबद्दल, सोसायटीचे सरचिटणीस नरेश गायकवाड म्हणाले की, मुख्यत्वे सर्व सदस्यांच्या एकजुटीमुळे आणि महिलांनी मूकपणे विरोध करण्यासाठी बाहेर पडलेल्या मार्गामुळे हे शक्य झाले.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन एन जावळे यांनी महिलांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार करून शेवटी संकुलातील दारू दुकानाला परवानगी न देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी आभार मानले.

# विशेष शाळेत शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती राधाबाई खेमचंद परमार रोटरी कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेत ब्लॅक अँड व्हिच कंपनीच्या सीएसआर निधीतून सेवा सहयोग फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने कर्णबधिर दिव्यांग मुलांच्या विशेष शाळेत विविध शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.




या वेळी संस्थेचे चेअरमन रोटेरियन अरविंद सावळेकर संस्थेचे सचिव रोटरियन प्रमोद वालेकर, रोटरी क्लब अध्यक्ष चारूदत्त भगत, रोटेरियन गुरुदेवसिंग कोहली, रोटरीन निलेश पोटे त्याचबरोबर ब्लॅक अँड व्हिच कंपनीचे सीनियर एच आर डायरेक्टर इंडिया अरविंद शर्मा तसेच सीएसआर कमिटीचे वैभव चव्हाण, अभिजित तापिसे, योगेश उपाध्याय हे उपस्थित होते.

सेवा सहयोग फाउंडेशन मुंबई यांच्यातर्फे दिपाली देवाळे, विशाल देसाई, आकाश गुप्ते, सुषमा शिंदे आदी उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी हे तत्व अंगीकारून समाज व समाजातील प्रत्येक घटकांच्या गरजा ओळखून त्या परिपूर्ण करण्याचे ब्लॅक ॲण्ड व्हिच कंपनी सेवा सहयोग फाउंडेशन मुंबई यांच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष करत आहेत. विशेषतः दुर्लक्षित घटक आरोग शिक्षण तसेच समाजोपयोगी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कंपनी कार्यरत आहे. ब्लॅक ॲण्ड व्हिच कंपनीच्या सीएसआर फंडातून शाळेसाठी आज निवासी विभागासाठी रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, टीव्ही, ऑडिओ मीटर व स्पीच ट्रेनर तसेच श्रवण यंत्र इत्यादी अत्यावश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिव्यांग मुलांच्या गरजापूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सामान्य मुलांप्रमाणेच दिव्यांग मुलांसाठी शाळा आणि त्यांचे शिक्षण अत्यावश्यक गरज असून त्यांच्यासाठी कंपनीच्या माध्यमातून भविष्यातही आम्ही सहकार्य करण्यासाठी कटिबद्ध आहोत असे आश्वासन ब्लॅक ॲण्ड व्हिच कंपनीचे अरविंद शर्मा यांनी केले. ब्लॅक ॲण्ड व्हिच कंपनीचे हे सामाजिक कार्य खरंच कौतुकास्पद आहे आणि समाजातील प्रत्येक घटकाला ते न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत, असे गौरवोदगार संस्थेचे सावळेकर यांनी काढले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अरविंद शर्मा यांच्या हस्ते तसेच सेवासयोग फाउंडेशन मुंबई यांच्यातर्फे उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते ३६ कर्णबधिर दिव्यांग विद्यार्थ्यांना श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या व शाळेच्या वतीने संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर यांनी मान्यवरांचे आभार मानले.

या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेच्या विशेष शिक्षिका अरूंधती बंदसोडे यांनी केले.

# आवक मंदावल्याने कांदा कडाडला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वातावरण बदलामुळे यंदा कांद्याची लागवड दोन महिने उशिरा झाली. त्यामुळे नवीन कांदा बाजारात यायला विलंब झाल्याने कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. किरकोळ बाजारात कांद्याने ६० रुपयांचा भाव गाठला. आणखी काही दिवस कांद्याचे भाव उच्च पातळीवर राहतील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करीत आहेत.



नेहमी घाऊक बाजारात कांद्याच्या १०० ते १२५ गाड्या येतात, मात्र आता बाजारात कांद्याच्या केवळ ५० ते ६० गाड्या घाऊक बाजारात येत आहेत, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. नवीन कांदा यायला दोन महिन्यांचा कालावधी आहे. तोपर्यंत हा कांदा बाजारात उपलब्ध होणार आहे. घाऊक बाजारातच ५० आणि ५५ रुपये किलोला भाव द्यावा लागत असल्याने किरकोळ बाजारात हा कांदा ६० रुपयांवर गेला आहे, तर दोन नंबरचा कांदा ५० रुपये किलोने खरेदी करावा लागत आहे.

आवक निम्म्यावर आल्याने कांद्याची मागणी पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामी, कांद्याचे दर वाढायला सुरुवात झाली आहे. त्यातही आता नवरात्रीनंतर बाजारात कांद्याच्या मागणीत वाढ झाली आहे. घाऊक बाजारात काही महिन्यांपासून उत्तम दर्जाचा नंबर एकचा कांदा केवळ २० टक्के येत आहे. त्यामुळे या कांद्याला ५० ते ५५ रुपये किलोचा भाव मिळत आहे.

इतर सर्व कांदा हा सोलपट निघालेला, जास्त काळ साठवून ठेवलेला आहे. त्यामुळे हा कांदा जास्त वेळ टिकणारा नाही. त्या कांद्यालाही ४० ते ५० रुपयांचा भाव मिळत आहे.

## निवडक

### कपिल गायकवाड यांना पुरस्कार



**माणगाव** : नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवाशी व नगरपंचायतीचे माजी पाणीपुरवठा सभापती तसेच विद्यमान नगरसेवक कपिल नरेंद्र गायकवाड यांना राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कपिल गायकवाड यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे. कपिल गायकवाड हे माणगावचे माजी सरपंच नरेंद्र गायकवाड यांचे कनिष्ठ सुपूत्र असून ते समाजात सामाजिक बांधिलकी राखून काम करीत असून सामाजिक कार्यात नेहमीच हिरीरीने सक्रिय सहभाग घेत असतात.

### खालापुरातून दोघे बेपत्ता




**चौक** : खालापूर तालुक्यातील दोन व्यक्ती १५ दिवसांपासून बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या दोन व्यक्ती दिसल्यास खालापूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन खालापूर पोलीस यांनी केले आहे. संतोष लक्ष्मण वाघमारे (वय ३५) व सुवर्णा भरत जाधव (वय ३०, रा.शिरवली आदिवासीवाडी, खालापूर) हे दोघेही ६ ऑक्टोबर २०२४ रोजी घरात कोणास काहीही न सांगता कुठेतरी निघून गेले ते अद्याप सापडले नाहीत. त्यामुळे त्याची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. हे दोघेही दिसल्यास त्वरीत खालापूर पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन खालापूर पोलिसांनी केले आहे.

### गोरगरीब जनतेला ब्लँकेटचे वाटप

**माणगाव** : चॅरिझेन व रेड हाऊस (शंतनू कुकडे) फाउंडेशन यांच्यामार्फत शहरातील गोरगरीब जनतेला सोमवारी (दि.२१) सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. गरीब जनतेसाठी समाजात काम करीत असल्याने त्यांच्या विशेष प्रयत्नांनी चॅरिझेन व रेड हाऊस फाउंडेशन यांच्या सहकार्याने त्यांनी माणगाव शहरातील गोरगरीब अशा ३०० लोकांना सोमवारी ब्लँकेटचे वाटप केले. त्या वेळी उपस्थितीत महिलांनी फाउंडेशनबरोबरच सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांचे विशेष आभार व्यक्त केले.



# रायगडातील २८ धरणांत ९४.५३ टक्के पाणीसाठा

**रोहे** : **प्रतिनिधी**

यावर्षी रायगड जिल्ह्यात मुबलक पाऊस पडला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील धरणात चांगला पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. रायगड जिल्ह्यातील २८ धरणात सरासरी ९४.५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून यापैकी १८ धरणक्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. २८पैकी १७ धरणक्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

मुरूड तालुक्यातील फणसाड, तळा तालुक्यातील वावा, रोहा तालुक्यातील सुतारवाडी, सुधागड तालुक्यातील कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, महाड तालुक्यातील वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, खालापूर तालुक्यातील भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी या धरणात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

पेण तालुक्यातील आंबेघर धरणात ९१ टक्के पाणीसाठा, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणात ९५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ८९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रानिवली धरणात ८७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणात ६५ टक्के पाणीसाठा, अवसरे धरणात ७१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणात ९२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, बामणोली धरणात ८९ टक्के पाणीसाठा, उसरण धरणात ८९ टक्के पाणीसाठा, उरण तालुक्यातील पुनाडे धरणात ७९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येत असलेल्या २८ धरण क्षेत्रात ९४.५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.


**१७ धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू**



## रोहा पोलिसांची गावठी दारू विक्रीविरोधात धडक मोहीम

**रोहे** : **प्रतिनिधी**

रोहा पोलिसांनी निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील बेकायदा गावठी दारूविरोधात धडक मोहीम सुरू केली असून अवैध गावठी दारूच्या अड्ड्यवर दोन ठिकाणी धाड टाकली आहे.



सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्याने पोलिसांनी आपली गस्त वाढविली आहे. रोहा पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि.१९) झापडी येथील आरोपीकडे १५०० रुपये किमतीची तयार गावठी दारूसह एकूण ६६,३०० रुपये किमतीचा दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य सापडले. पुढील तपास पोलीस हवालदार भोईर करीत आहे.

त्याचप्रमाणे रविवारी (दि.२०) कारविणे धनगरवाडी गावच्या हद्दीत रस्त्याच्या बाजूला मोकळ्या जागेत आरोपीकडून २००० रुपयांचा एक प्लास्टिकचा सफेद रंगाचा कॅन, त्यात सुमारे २० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू असा एकूण २०५० रुपये किमतीचा माल सापडला. या आरोपीविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार म्हात्रे करीत आहेत.

## मुरूडमधील अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**मुरूड** : **प्रतिनिधी**

मुरूडचे माजी नगरसेवक व तालुका सुपारी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बाबा दांडेकर यांनी आपल्या समर्थकांसह त्याचप्रमाणे जोसरांजण गावातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

या वेळी बाबा दांडेकर यांच्यासह सुपारी संघाचे संचालक अवी भगत, तज्ज्ञ संचालक राजू पोतनीस, माजी नगरसेवक भाऊ भगत, संचालक बाळा रणदिवे, समाजसेवक गजानन भुसाने, केने पाखडी अध्यक्ष सुधीर मेस्त्री यांच्यासह इतरांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, मुरूड शहरात गेली अनेक टर्म नगरसेवक म्हणून बाबा दांडेकर यांची कारकिर्द वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा मुरूड शहराच्या विकासासाठी होणार आहे. त्यांचा पक्षातर्फे विशेष सन्मान बाळगला जाईल, असे त्यांनी सांगितले. बाबा दांडेकर यांनी, मुरूड शहरातून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी माझ्यासह सर्व सहकारी परिश्रम घेतील, असे सांगितले. या वेळी जिल्हा उपप्रमुख भरत बलोसे, जिल्हा महिलाप्रमुख तृप्ती रुपेश पाटील, शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिणमिने, माजी नगरसेवक विजय पाटील, शहरप्रमुख संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, राजपुरी मतदारसंघ प्रमुख जीविता मिनमिने, माजी नगरसेवक मेघाली पाटील, युगा ठाकूर, वावरूनी सरपंच ऋतुजा वरणकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

जोसरांजण गावातील किशोर गायकर, हरी गायकर, सखाराम गायकर, राजेश गायकर, सुनील मादाडकर, अमित गायकर, जगन्नाथ पाटील, नथुराम गुंड, ग्रामपंचायत सदस्य दुर्गा गुंड, विठ्ठल गुंड, अशोक पाटील, सुभाष पाटील, मंगेश पाटील, नारद नाईक आदींसह १६० जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार दळवी यांनी, गावाच्या विकासाला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.



## 'बौद्ध धम्मातील आषाढ ते आश्विन पौर्णिमा जीवनात परिवर्तन करणारी'



**पेण** : **प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आचरणानुसार बौद्ध धम्मातील आषाढ ते आश्विन पोर्णिमा वर्षावास मालिकेदरम्यान जीवनात परिवर्तन करणारी असल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेश सरचिटणीस सुशील वाघमारे यांनी वाशी येथे केले.

पेण बौद्ध महासभा आयोजित सुरू असलेल्या तीन महिन्यांच्या वर्षावास मालिकेच्या धम्मसंस्कार शिबिराचा समारोप रविवारी (दि. २०) वाशी येथील लुंम्बिनी बुद्धविहारात करण्यात आला होता.

या कार्यक्रमास रायगड जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, सरचिटणीस विजय कांबळे, उपाध्यक्ष गणेश कांबळे, संस्कार सचिव संतोष जाधव, ज्येष्ठ प्रवचनकार राजेंद्र बावस्कर, ॲड.दिपक कांबळे, पेण तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, पांडुरंग जाधव, मारुती शिंदे, सुनील कांबळे, सचिन कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष उषा कांबळे, छाया गवई, त्रिशीला सावळे, माजी नगरसेविका प्रतिभा जाधव आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

प्रदेश सरचिटणीस वाघमारे पुढे म्हणाले की, आपली मातृसंस्था ही महापुरुषांच्या विचारधारेला अनुसरून काम करत आहे. संस्थेचे काम सुरळीतपणे सुरू असताना आपण आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ राहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे समाजाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात समता सैनिक दल निर्माण होणे गरजेचे असून पेणचे अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांच्या माध्यमातून चाललेल्या धम्मकार्याचा आढावा पाहता इतर तालुक्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा, असे त्यांनी सांगितले. या वेळी जिल्हा समता सैनिक दल आयोजित कबड्डीपटू खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## अलिबागमधील पत्रकारांची कुटुंबासह आरोग्य तपासणी





**अलिबाग** : **प्रतिनिधी**

पत्रकाराचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त माध्यमातून पत्रकार आणि कुटुंबाची आरोग्य तपासणी आणि आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४०हून अधिक पत्रकार आणि कुटुंबाची आरोग्य तपासणी आणि आभा कार्ड नोंदणी करण्यात आली.

अलिबाग पंचायत समिती येथील अलिबाग प्रेस असोसिएशन कार्यालयात मंगळवारी (दि.२२) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.शीतल घुगे जोशी, ज्येष्ठ पत्रकार नागेश कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, सदस्य आणि कुटुंबीय, जिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर, परिचारिका उपस्थित होते.

पत्रकार हे सतत विविध प्रश्न आपल्या वृत्तपत्रात मांडून त्यावर प्रकाश टाकत असतात. त्यामुळे शासन, प्रशासन स्तरावर त्याची दखल घेऊन प्रश्न सोडविले जातात. पत्रकार हा ऊन, वारा, पाऊस या काळात आपले काम करीत असतो. अशावेळी त्याच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होतो. शासनाने सर्वांना पाच लाखांपर्यंत मोफत उपचार रुग्णालयात देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आभा आणि आयुष्यमान कार्ड काढणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी केले आहे.

शिबिरात पत्रकार आणि कुटुंबाची बीपी, शुगर, रक्त तपासणी करण्यात आली. ३५हून अधिक पत्रकार आणि कुटुंबांची तपासणी करण्यात आली. आभा आणि आयुष्यमान कार्ड नोंदणी ही यावेळी करण्यात आली. वैभव नाईक आभा ऑपरेटर, पूजा पवार, परिचारिका, डॉ. रुपाली घुगे, डॉ. वैभव पाटील, हृतिका प्रधान, निलेश भंडे लॅब असिस्टंट, जयेश इदाते, अधिपरिचारक, आयुषा पटेल फॅसिलिटी व्यवस्थापक यांनी आरोग्य तपासणी आणि कार्ड नोंदणी केली. महेश पोरे यांनी सूत्रसंचलन केले.

रोह्याचे ज्येष्ठ पत्रकार मिलिंद अष्टीवकर यांची मराठी पत्रकार परिषदेवर नुकतीच अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. याबाबत अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे मिलिंद अष्टीवकर यांचा सन्मान करण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या हस्ते मिलिंद अष्टीवकर यांना शाल, ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

## नेरळ रेल्वेस्थानकात आणखी एक पादचारी पूल

**कर्जत, माथेरान** : **प्रतिनिधी**

नेरळ रेल्वे स्थानकात विकासकामे मध्य रेल्वेकडून सुरू आहेत. स्थानकातील फलाट १वर आणखी एका पादचारी पुलाची निर्मिती मध्य रेल्वेकडून सुरू आहे. या नवीन पादचारी पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून काही दिवसांनी या पुलाचे काम पूर्ण होणार असून स्कायवॉकचे काम पूर्ण झाल्यावर हा पादचारी पूल वाहतुकीस खुला होण्याची शक्यता आहे.

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकात दोन पादचारी पूल असून मुंबई भागातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी नेरळ स्थानकात फलाट १वर आणखी एक पादचारी पूल बांधला जात आहे.

ब्रिटिश काळातील या स्थानकात ब्रिटिश काळात ज्या ठिकाणी पादचारी पूल होता. अगदी त्याच ठिकाणी नवीन पादचारी पूल बांधला जात आहे. हा पादचारी जुन्या पादचारी पुलाच्या मुख्य भागाला जोडला जाणार आहे.



## चौकमध्ये प्राणीमित्रांच्या सहाय्याने गाईला जीवदान



**चौक** : **प्रतिनिधी**

चौकमध्ये धुवांधार पावसाने थैमान घातले असताना प्राणीमित्र रामदास काईनकर यांनी आपले सहकारी आणि चौक पोलीस यांच्या मदतीने एका गाईला जीवदान दिले.

प्राणीमित्र रामदास काईनकर हे जुना मुंबई-पुणे मार्गावरून जात असताना त्यांना वावंढळ हद्दीत असणाऱ्या पुलाखाली नाल्यात एक गाय पाण्यात बसलेली दिसली. कदाचित उन्हाची काहिली जास्त प्रमाणात असल्याने गाय पाण्यात बसलेली असेल, असे त्यांना वाटले. त्यामुळे ते पुढे निघून गेले. पुन्हा सायंकाळी ते परत तिथून जात असताना गाय त्याच ठिकाणी दिसली. त्यामुळे ते गाडीतून उतरून गाय ज्या ठिकाणी बसली होती तिथे येऊन पाहणी केली. एकट्याने गाय उठवण्याचा प्रयत्न केला पण गाय हलली नाही आणि भयानक पावसाचे थैमान सुरू झाले. त्यांनी आपल्या मित्रांना सांगून चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिष मोरे यांनीही कळविण्यात आले. रामदास काईनकर यांचे सहकारी ओमकार बोराडे, किशोर काईनकर, मंदार पालांडे, ज्ञानेश्वर काईनकर, शंकर काईनकर, भावेश ठोंबरे, संकेत पाटील, ऋतिक बोराडे, संस्कार देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिष मोरे, हवालदार उघडा, बोडके, मनोहर पाटील, पोलीस शिपाई अक्षय अतिग्रे, अंकुश पोले यांनी खोल आणि वाहत्या पाण्यात गाईला धरून ठेवले होते.


निरीक्षक मनिष मोरे यांनी हायड्रा मागविला. हा हायड्रा पुलाखाली उतरविणे शक्य नव्हते. त्यामुळे मुंबई-पुणे जुन्या रस्त्यावरून गाईला बांधून हायड्राने उचलून रामदास काईनकर यांच्या डंपरमध्ये ठेऊन कलोते येथील समीर व्होरा यांच्या अनिमल ट्रस्ट या गोशाळेत दाखल करण्यात आले.

## शेतीपिकांचे पंचनामे तातडीने सुरू करण्याचे आदेश

**चौक** : **प्रतिनिधी**

सतत पडणाऱ्या पावसाने खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्याचे पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिले आहेत.

गेले चार ते पाच दिवस सतत पावसाचे थैमान सुरू आहे. पिकलेले भात वादळ वारा आणि जोरदार पावसाने आडवे झाले आहे. हे भात चिखलात रुतून बसले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. याची माहिती तालुका कृषी विभाग



यांच्यामार्फत तहसीलदारांना कळविण्यात आले आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांचे नुकसान या बाबीकरिता सुधारीत निकष, कार्यपद्धती व मदतीचे दरनुसार नैसर्गिक आपत्ती निवारण करण्यासाठी ऑक्टोबर २०२४ व त्यानंतर शेतीपिक व फळपिक नुकसानीचे पंचनामे ३३ टक्केपेक्षा जास्त असणाऱ्या शेतकऱ्यांचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिले आहेत. हे पंचनामे तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे जमा करण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.

खालापूर गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना याबाबत माहिती दिली आहे. सर्व मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना तातडीने कळविण्यात आले आहे, अशी माहिती निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिली.



# वर्ल्डकपमध्ये दीपिकाचा 'रौप्य'वेध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची नामांकित तिरंदाज दीपिका कुमारीने विश्वचषकाच्या फायनलमध्ये रौप्यपदक जिंकले. अंतिम सामन्यात तिचा चीनच्या खेळाडूने पराभव केल्याने सुवर्णपदक हुकले. विशेष बाब म्हणजे दिग्गज तिरंदाज दीपिका कुमारीने सहाव्यांदा तिरंदाजी वर्ल्ड कपफायनलमध्ये पदक जिंकण्यात यश मिळवले.

दीपिकाला उपांत्य फेरीपर्यंत कोणत्याच अडचणीचा सामना करावा लागला नाही, पण सुवर्ण पदकाच्या सामन्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या जियामनकडून तिला पराभव पत्करावा लागला. दीपिका नवव्यांदा वर्ल्डकप फायनल खेळत होती.

२००७मध्ये डोला बॅनर्जीने वर्ल्डकप फायनलमध्ये भारतासाठी सुवर्णपदक जिंकले होते. भारताची अव्वल रिकर्व्ह तिरंदाज दीपिका कुमारीने विश्वचषक फायनलमध्ये तिचे पाचवे रौप्यपदक जिंकले. दीपिकाने उपांत्यपूर्व फेरीत यांग झियाओलीचा ६-० असा पराभव केला आणि त्यानंतर अलेजांड्रा व्हॅलेन्सियाचा ६-४ असा पराभव केला, मात्र अंतिम फेरीत भारतीय तिरंदाज ली जियामनकडून ६-० अशा फरकाने पराभूत झाली अन् ती सुवर्ण पदकापासून एक पाऊल दूर राहिली.

आपल्या लहानग्या लेकीला भारतात ठेवून गेलेली दीपिका चौथ्यांदा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झाली होती. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. दीपिका २०२२मध्ये एका मुलीची आई झाली. ती अद्याप ऑलिम्पिकमधील तिच्या पहिल्या पदकाच्या शोधात आहे.

## विश्वचषकात यशस्वी कारकिर्द

दीपिकाच्या नावावर या स्पर्धेत पाच रौप्यपदके आणि एका कांस्यपदकांसह सहा पदके जिंकण्याचा विक्रम आहे. २०११, २०१२, २०१३, २०१५ आणि २०२४मध्ये ती या स्पर्धेत उपविजेती ठरली होती. तिने २०१८मध्ये कांस्यपदक पटकावले होते. दीपिकाने २०२४च्या विश्वचषक मालिकेतील कामगिरीच्या जोरावर तिरंदाजी विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. शांघाय विश्वचषक स्पर्धेतही तिने रौप्यपदक पटकावले होते. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दीपिकाने भजन कौर आणि अंकिता भकटसह महिलांच्या वैयक्तिक व महिला सांघिक स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. दोन्ही स्पर्धांत तिची धाव उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आली.



# पंतने इन्स्टावर शेअर केलेल्या स्टोरीने वेधले लक्ष

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानासोबतच ऋषभ पंत सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतो, जिथे तो प्रत्येक सामन्यानंतर काही रील व्हिडिओ शेअर करतो. या वेळी रील व्हिडिओ शेअर करण्याव्यतिरिक्त पंतने एक अशी इन्स्टा स्टोरी शेअर केली आहे, ज्याने चाहत्यांचे लक्ष वेधले आहे.

पंतने आपल्या इन्स्टा स्टोरीवर कोट शेअर केला आहे, ज्यामध्ये लिहिले आहे की, कधीकधी शांत राहणे चांगले असते आणि देवाने लोकांना दाखवू देणे सर्वात उत्तम असते. या स्टोरीवरून चाहते आपापल्या पद्धतीने अंदाज बांधत आहेत. ज्यामध्ये काही चाहत्यांना वाटत आहे की, तो दुखापतीमुळे दुसऱ्या सामन्यात खेळू शकणार नाही, तर काही चाहत्यांना वाटत आहे की, दिल्ली कॅपिटल्स संघ यंदा आयपीएल २०२५साठी कायम ठेवणार नसल्याने त्याने अशी स्टोरी शेअर केली.

ऋषभ पंतला दिल्ली कॅपिटल्स रिटेन करणार नसल्याची अटकळ मोठ्या प्रमाणात बांधली जात आहे, पण त्याला सोडल्यास फ्रेंचायझीचे मोठे नुकसान होऊ शकते. जागतिक क्रिकेटमधील स्फोटक फलंदाज म्हणून पंतची ओळख आहे. जर दिल्ली कॅपिटल्ससारखा संघ आपल्या सपोर्ट स्टाफमध्ये बदल करून खेळाडू बदलण्याचा निर्णय घेत असेल, तर पंत आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये सर्व काही ठीक नाही हे स्पष्टपणे दिसून येते.



# क्षितिजा मरागजेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक

**खालापूर : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत परभणी येथे जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा झाली. या स्पर्धेत मुंबई विभागाचे नेतृत्व करताना रायगडच्या क्षितिजा जगदीश मरागजे हिने सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक मिळवत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

स्पर्धेत राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, लातूर, संभाजी नगर, नाशिक, नागपूर, अमरावती या आठ विभागातील कुस्तीपटूंनी सहभाग घेऊन राज्यस्तरीय स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी आपले कौशल्य पणाला लावले होते. यामध्ये क्षितिजाने बाजी मारली.

क्षितिजा ही कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाची मल्ल असून राजाराम कुंभार, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, दिवेश पालांडे, विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या आठव्या वर्षांपासून कुस्तीचा सराव करत आहे. ती खोपोली येथील कारमेल कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकते. तिला शाळेचे क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे, समीर शिंदे, जयश्री नेमाने यांचेही मार्गदर्शन लाभले. याशिवाय ती केंद्र शासनाच्या स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या मुंबई येथील कुस्ती केंद्रात द्रोणाचार्य अवॉर्ड विजेते राजसिंग चिकारा, अमोल यादव, शिल्पी नरशिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे डावपेच शिकत आहे.

राज्यस्तरीय पातळीवर केलेल्या सुवर्ण कामगिरीनंतर क्षितिजाची गोरखपूर (उत्तर प्रदेश) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सलग तीन वर्षे सुवर्णपदक मिळवून इतिहास रचलेल्या क्षितिजाचे कॉन्व्हेंट स्कूलच्या मॅनेजर सिस्टर मरिना, मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील पाटील, कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार न्यासाचे संस्थापक अध्यक्ष राजाराम कुंभार, जिल्हा क्रीडाधिकारी राजेंद्र अतनूर, महाराष्ट्र राज्य कुस्ती प्रशिक्षक संदीप वांजळे, खोपोली पोलीस निरीक्षक शीतल राऊत, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, किशोर पाटील, कोयना समाजाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि अनेक मान्यवरांकडून कौतुक होत आहे.

# टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये वगळल्याबाबत संजू सॅमसनचा खुलासा



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा धडाकेबाज फलंदाज संजू सॅमसनने आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४च्या फायनलबाबत मोठा खुलासा केला आहे. ज्या फायनलमध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून दुसरा टी-२० विश्वचषक जिंकला. संजू सॅमसनला या स्पर्धेत एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही, पण त्याला थेट फायनल सामन्यात खेळवले जाणार होते, मात्र, नाणेफेकीच्या १० मिनिटे आधी कर्णधार रोहित शर्माने निर्णय बदलला आणि सॅमसनला खेळवले नाही. याबाबत आता स्वत: संजूने मोठा खुलासा केला आहे.

संजू सॅमसनने क्रीडा पत्रकार विमल कुमारला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, बार्बाडोसमध्ये झालेल्या फायनलमध्ये मला खेळण्याची संधी दिली जाणार होती. त्यामुळे मला तयार राहण्यास सांगण्यात आले होते. मी तयारही होतो, पण नाणेफेकीपूर्वी मला सांगण्यात आले की, आम्ही मागील प्लेइंग इलेव्हनसह खेळणार आहोत. हे ऐकून मी नक्कीच थोडा निराश झालो होतो. त्या वेळी वॉर्म अप चालू असताना रोहितभाई आले आणि मला बाजूला घेऊन गेले. ते असा निर्णय का घेत आहेत, हे समजावून सांगू लागले. ते म्हणाले संजू, तुला समजतंय ना? तुम्हाला त्यांची शैली माहीत आहे, ते अगदी सहज बोलतात.

सॅमसन पुढे म्हणाला, रोहितभाई मला म्हणाले अरे, तुला समजत आहे ना मी काय करण्याचा प्रयत्न करत आहे. यावर मी म्हणालो, की नक्कीच समजू शकतो. त्यामुळे आपण अगोदर सामना खेळूया आणि यावर जिंकल्यानंतर बोलू. आधी आपण सामना जिंकू आणि नंतर बोलू. यावर रोहितभाई म्हणाले, नाही मग ते पुढे गेले आणि पुन्हा माघारी आले. मला म्हणाले, नाही, तू मला मनातल्या मनात खूप काही बोलत आहेस, असे मला वाटत आहे. तू आनंदी नाहीस. तुझ्या मनात काहीतरी आहे. मी म्हणालो, नाही रोहित भाई, असे काही नाही. यानंतर आमच्यात पुन्हा संभाषण सुरू झाले. तेव्हा मी म्हणालो की, तुम्ही मला खेळाडू म्हणून विचाराल तर मला खेळायचेच आहे.

यानंतर रोहित शर्माने सांगितले की तो काय विचार करत आहे. संजू सॅमसनने आपल्या मुलाखतीत पुढे सांगितले की, रोहितभाईने सांगितले की त्यांचा पॅटर्न असा आहे. मी अशा प्रकारे काम करतो. तेव्हा मी म्हणालो की, माझ्या मनात तुमच्याबद्दल खूप आदर आहे. मला वाटते की, तुम्ही येऊन मला समजावून सांगितलं ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, पण मला नेहमी खंत वाटेल की, मी तुमच्या नेतृत्वाखाली फायनल खेळू शकलो नाही.

### रोहितभाई माणूसच वेगळा!

मला रोहितभाईंची एक गोष्ट आवडली ती म्हणजे फायनलसारख्या मोठ्या सामन्याआधी तुम्ही नाणेफेकीच्या आधी १० मिनिटे अशा व्यक्तीसोबत घालवत आहात, ज्याला तुम्ही खेळवणार नाही. तेव्हा मला कळले की हा माणूसच वेगळा आहे.

# तलवारबाजी स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत खारघरच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात झालेल्या मुंबई विभागीय तलवारबाजी स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

क्षितीज प्रमोद आगलावे (बारावी वाणिज्य) याने प्रथम क्रमांक, तर समीक्षा संतोष पाटील (बारावी वाणिज्य) हिने तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांची छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.





याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा

# पुणे जिल्हा सर्वसाधारण विजेता



**पुणे : प्रतिनिधी**

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि क्रीडा प्रबोधिनी सायकलिस्ट असोसिएशन यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या महाराष्ट्र राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने १४ सुवर्ण, सहा रौप्य आणि सहा कांस्यपदकांसह एकूण ९७ गुणांसह स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले, तर उपविजेतेपद दोन सुवर्ण, आठ रौप्य आणि सात कांस्यपदकांसह एकूण ४१ गुण मिळवताना क्रीडा प्रबोधिनी पुणे संघाने पटकावले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताब मुलांमध्ये दोन सुवर्णपदकांसह पुणे क्रीडा प्रबोधिनीच्या सिद्धेश घोरपडे याने, तर मुलींमध्ये दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदकासह आभा सोमण यांनी पटकावले.

पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्राचे अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार, निगडी पोलीस ठाण्याचे निरीक्षक शत्रुघ्न माळी, पीआय विलास राठोड, पीआय मिलींद झोडगे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अरविंद चव्हाण, स्पर्धा संचालिका दिपाली पाटील, शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित मिनाक्षी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पृथ्वी शॉला मुंबई रणजी संघातून डच्चू!

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी ट्रॉफी स्पर्धेतील त्रिपुराविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या सामन्यातील संघातून स्टार फलंदाज पृथ्वी शॉला संघातून डच्चू देण्यात आला आहे. त्याला संघातून वगळण्याचे कारण त्याचा खराब फॉर्म आणि फिटनेस असल्याचे सांगितले जात आहे.



पृथ्वी शॉ गेल्या काही काळापासून अत्यंत खराब फॉर्मशी झुंजत असून त्याच्या बॅटमधून आतापर्यंत मोठी खेळी पाहिला मिळालेली नाही. फॉर्मव्यतिरिक्त त्याची फिटनेस हीदेखील मोठी समस्या आहे. त्याच्यावर अनुशासनहीनतेचा आरोपही करण्यात आला आहे.

वृत्तानुसार टीम मॅनेजमेंटने एमसीएला कळवले आहे की, पृथ्वी शॉच्या शरीरात ३५ टक्के फॅट आहे आणि संघात परत येण्यापूर्वी त्याला कठोर प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. एमसीएच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, त्याला वगळण्यात आले आहे आणि निवडीसाठी विचारात घेण्यासाठी त्याला प्रशिक्षणात परत जाणे आणि शरीराचे वजन कमी करणे आवश्यक आहे.

पृथ्वी शॉला संघातून वगळण्याचा निर्णय केवळ निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाचा नव्हता, तर प्रशिक्षक आणि कर्णधारालाही त्याला संघातून वगळण्याची इच्छा होती, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

क्रिकबझच्या वृत्तानुसार शॉची अनुशासनहीनता ही मुंबई क्रिकेट असोसिएशनसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे. निवड समिती आणि संघ व्यवस्थापन यांना शॉला वगळून धडा शिकवायचा आहे. पृथ्वीचे नेट सत्रात उशिरा येणे ही संघ व्यवस्थापनासाठी मोठी चिंतेची बाब आहे.

याशिवाय असे सांगण्यात आले की तो नेट सत्रे गांभीर्याने घेत नाही आणि त्याच्या वजनाबद्दलही चिंता वाढत आहे.

### खराब फिटनेस आणि फॉर्ममुळे बाहेरचा रस्ता

# सर्फराझ खान झाला 'अब्बा'जान!



**मुंबई : प्रतिनिधी**

बंगळुरू कसोटी सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध १५० धावांची दमदार खेळी करणाऱ्या सर्फराझ खानला आनंदाची बातमी मिळाली आहे. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले, तर दोन दिवसांनंतर सोमवारी त्याच्या घरी नवीन पाहुण्याचे आगमन झाले आहे. त्यांची पत्नी रोमना जहूरने मुलाला जन्म दिला आहे.

याबाबत स्वतः सर्फराझ खानने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर फोटो शेअर करून माहिती दिली आहे. सर्फराझ खान आणि रोमना जहूर यांचे गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये लग्न झाले होते. सर्फराझने इन्स्टा स्टोरीवर दोन फोटो शेअर केले आहेत. एका फोटोत तो आपल्या बाळासोबत दिसत असून तो मुलगा असल्याचे लिहिले आहे, तर दुसऱ्या फोटोत तो वडील आणि बाळासोबत दिसत आहे.

# सुनील गावसकरांकडून सर्फराझचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्ध १५० धावांची खेळी साकारत सर्फराझ खानने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. याआधी सर्फराझला त्याच्या वजनामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आता याबाबत भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी मोठे वक्तव्य केले आहे.

माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी सर्फराझचे कौतुक करताना भारताच्या निवड समितीला फटकारले आहे. गावसकर म्हणाले, सर्फराझने ज्या प्रकारे दमदार फलंदाजी करत पुनरागमन केले आहे ते त्याच्या कंबरेपेक्षा नक्कीच मोठे आहे.

यंदा इंग्लंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेत टीम इंडियाचे अनेक महत्त्वाचे फलंदाज उपलब्ध नव्हते. त्या वेळी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने आपले नाणे खणखणीत असल्याचे सिद्ध केलेल्या सर्फराझला पदार्पणाची संधी मिळाली. सर्फराजने तीन कसोटी सामने खेळले आणि तीन अर्धशतके झळकावली, मात्र त्यानंतर बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याला वगळण्यात आले. शुबमन गिल न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे सर्फराझला भारतीय प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली.

सुनील गावसकर यांनी स्पोर्ट्स स्टारच्या स्तंभात लिहिले की, सर्फराझने ज्या प्रकारे मैदानावर बॅटने पुनरागमन केले, हे त्याच्या कंबरेपेक्षा नक्कीच मोठे आहे. दुर्दैवाने भारतीय निवड समितीत बरेच असे निर्णय घेणारे लोक होते, ज्यांच्यामुळे सर्फराझला दीर्घकाळ टीम इंडियामध्ये स्थान मिळाले नाही. तरीही तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावा करत राहिला.

ऋषभ पंतचे उदाहरण देताना गावसकर म्हणाले की, तो आणखी एक खेळाडू आहे, ज्याची कंबर सडपातळ नाही, पण प्रभावशाली खेळाडू आहे. आपण हे विसरू नये की, तो दिवसभर यष्टीरक्षणही करतो. त्यामुळे यो-यो टेस्टकडे दुर्लक्ष करून खेळाडू मानसिकदृष्ट्या किती खंबीर आहे याकडे लक्ष दिले पाहिजे.

जीवेत् शरदः शतम्!

हरेश पवार

यांना वाढदिवसाच्या



हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
नितीन मंडलिक

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com